## नेमणे आहे

नामवंत दै. ‘जनता आवाज’ वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड

संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com



दैनिक

# जनता आवाज



साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्

पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.



सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल

सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534 | अमोल सिताराम थोरात पा. 9764626533 | ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु॥

राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु॥ 9765481334



अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १३५ गुरूवार, दि. १० जुलै २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये


# अखेर शिक्षकांच्या आंदोलनाला यश

जनता आवाज वृत्तसेवा

**मुंबई : मुंबईतील आझाद मैदानात गेल्या पाच दिवसांपासून सुरु असलेल्या विनाअनुदानित शिक्षकांच्या आंदोलनाला अखेर यश मिळाले आहे. शिक्षकांच्या विविध मागण्यांवर तोडगा काढत भाजप नेते आणि राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांनी काल सरकारनचे प्रतिनिधी म्हणून आंदोलनस्थळी भेट दिली आणि सरकारतर्फे सर्व मागण्या मान्य करण्याची घोषणा केली. तसेच अधिवेशन संपल्यानंतर खात्यात पैसे पडतील, असे महाजन यांनी सांगितले.**

## ● अधिवेशन संपल्यानंतर खात्यात येईल पगार
## ● मंत्री गिरीश महाजनांची आंदोलनस्थळी घोषणा



### तुमच्या खात्यात पगार टाकायचाच...

सरकारी तिजोरीवरील आर्थिक संकटामुळे आमच्याकडून पुढचे टप्पे देण्यास उशीर झालेला आहे. तुम्ही याबाबत वारंवार मागणी करत होता. पण आता तुमचा पगारा प्रश्न मार्गी लागलेला आहे. आम्हाला तुमच्या खात्यात पगार टाकायचाच आहे, असे भाजप नेते आणि राज्याचे मंत्री गिरीश महाजन म्हणाले.

राज्यातील सुमारे ५,००० खासगी विनाअनुदानित शाळांना टप्प्याटप्प्याने शासकीय अनुदान देण्याचा निर्णय ऑक्टोबर २०२४ मधील विधानमंडळ अधिवेशनात घेण्यात आला होता. मात्र, त्या निर्णयाला आता दहा महिने उलटूनही प्रत्यक्ष निधीच्या तरतुदीचा कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. त्यामुळे या शाळांमधील शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, सरकारच्या दिरंगाईविरोधात आता आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात आला होता. गेल्या पाच दिवसांपासून मुंबईतील आझाद मैदानात हे आंदोलन सुरू होते.

गिरीश महाजन म्हणाले की, आमची भूमिका सकारात्मक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सरकारला तुमची काळजी आहे. आम्हाला माहिती आहे की, आपण सामान्य कुटुंबातील आहात. तुमची रोजीरोटी ही आहे, त्यामुळे अतिशय धाडसी निर्णय फडणवीसांनी त्यावेळी घेतला. त्यानुसार, २० टक्के, ४० टक्के त्यानंतर ६० टक्के दिले.

याबाबत तुमच्या शिक्षकांच्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत ठरले आहे. पण या दोन-तीन दिवसात सर्व तांत्रिक बाजू समजावून घेऊन येत्या १८ तारखेला अधिवेशन संपेल तेव्हा तुमच्या खात्यात पैसे पडलेले असतील. यात कोणताही बदल होणार नाही, अशी ग्वाही गिरीश महाजन यांनी आंदोलक विनाअनुदानित शिक्षकांना दिली.

गेल्या अनेक वर्षांपासून पगाराविना काम करत असूनही शाळांचा शैक्षणिक दर्जा टिकवून ठेवण्यात त्यांनी मेहनत घेतली आहे. मात्र शासनाच्या अशा धोरणामुळे त्यांच्या रोजच्या जीवनावर गंभीर परिणाम होत आहे. आता केवळ आश्वासनांवर न चालता प्रत्यक्ष निधी वाटपाचे आदेश हवेत, अशी शिक्षकांची स्पष्ट मागणी होती.

### शेवटपर्यंत नियमित पगार मिळेल, मुख्यमंत्र्यांचा शब्द

मी कुठुनही काढेन, काहीही करेन पण तुमच्या खात्यात केवळ एका महिन्यापुरता नाही, तर हा पगार आता शेवटपर्यंत नियमितपणे मिळेल. ठरलेल्या टप्प्याप्रमाणे जो काही पगार असेल, तो तुमच्या खात्यात जमा केला जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. हा त्यांचा शब्द आहे, असेही गिरीश महाजन म्हणाले.

### सध्या ५,८४४ अंशतः अनुदानित खासगी शाळा

दरम्यान, राज्यामध्ये सध्या ५,८४४ अंशतः अनुदानित खासगी शाळा आहेत. यामध्ये ८२० प्राथमिक, १,९८४ माध्यमिक व ३,०४० उच्च माध्यमिक शाळा आहेत. या शाळांमध्ये एकूण ३,५१३ प्राथमिक, २,३८० माध्यमिक व ३,०४३ उच्च माध्यमिक तुकड्या कार्यरत आहेत. एकूण ८,६०२ प्राथमिक शिक्षक, २४,०२८ माध्यमिक शिक्षक आणि १६,९३२ उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी या शाळांमध्ये कार्यरत आहेत.

# संघर्षाची वेळ येवूच नये : पवार

जनता आवाज वृत्तसेवा


**मुंबई** : राज्यातील विना अनुदानित आणि सुमारे सहा हजार अंशतः अनुदानित शाळांना अनुदानाची वाढीव रक्कम मिळावी या मागणीसाठी शिक्षकांकडून आझाद मैदानात आंदोलन करण्यात येत आहे. पाच हजार विनाअनुदानित शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदान देण्यासंदर्भातील निर्णय राज्य सरकारने ऑक्टोबर २०२४ मध्ये अधिवेशनात घेतला होता. त्यानंतर यासंदर्भात शासन निर्णयही काढण्यात आला होता.




मात्र अजून देखील या शाळांच्या टप्पा अनुदानासाठी निधीची तरतूद सरकारकडून करण्यात आलेली नाही. जो पर्यंत मागणी मान्य होत नाही. तोपर्यंत आझाद मैदान सोडणार नसल्याचा पवित्रा या शिक्षकांनी घेतला आहे. तसेच या आंदोलनामध्ये रात्रीपासून रोहित पवार सहभागी झाले आहेत.

त्यानंतर आज या आंदोलनस्थळी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी भेट देत ‘तुमच्या मागण्या मान्य होण्यासाठी सरकारशी संवाद साधू आणि प्रश्न सोडवून पान ४

> एकदा १९८०-८१ साली असेच एक आंदोलन शिक्षकांनी केले होते. त्यावेळी राज्यकर्त्यांनी बघ्याची भूमिका घेतली. त्यांची मागणी होती की, केंद्र सरकार जे देतं ते राज्याने द्यावं, ती मागणी मान्य झाली नाही. त्यानंतर राज्याची जबाबदारी माझ्याकडे आली. तेव्हा मी केंद्र सरकार जे देतं ते राज्याने द्यावं ही शिक्षकांची मागणी मान्य केली. मात्र आता त्याच राज्यामध्ये अनुदानासाठी शिक्षकांना संघर्ष करावा लागतो. तुमच्या मागण्या मान्य होऊन तशी तरतूद सरकारकडून केली जाईल.
>
> **- शरद पवार, माजी केंद्रीय मंत्री**



# गुजरातमधील महिसागर नदीवरील कोसळला पूल

जनता आवाज वृत्तसेवा

**सुरत** : गुजरातच्या आणंद जिल्ह्यात काल, बुधवारी सकाळी भीषण दुर्घटना घडली. महिसागर नदीवरील वडोदरा आणि आणंद जिल्ह्यांना जोडणारा गंभीरा पूल अचानक कोसळला. या दुर्घटनेत आतापर्यंत तीन जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे, तर अनेक वाहने नदीत कोसळली. पूल कोसळण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

हा पूल ४३ वर्षे जुना होता आणि त्यावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक होत होती. सकाळी ८:३० वाजण्याच्या सास घडलेल्या या घटनेत दोन ट्रक आणि एक पिकअप व्हॅनसह चार वाहने नदीत पडली. पूल कोसळल्याने अनेक प्रवासी अडकल्याची माहिती आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडिओत अर्धवट तुटलेल्या पुलावर एक ट्रक लटकलेला दिसत आहे, ज्यामुळे या दुर्घटनेचे गांभीर्य अधोरेखित होते.

काँग्रेस नेते आणि विधानसभेतील विरोधी पक्षनेते अमित चावडा यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत या घटनेची माहिती दिली. त्यांनी प्रशासनाला तातडीने बचावकार्य सुरू करण्याचे आणि वाहतुकीसाठी पर्यायी व्यवस्था करण्याचे आवाहन केले. या दुर्घटनेमुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सध्या स्थानिक प्रशासन आणि बचाव पथके घटनास्थळी पान ४

# तुकडेबंदी कायदा शिथिल
## ५० लाख शेतकऱ्यांना दिलासा

जनता आवाज वृत्तसेवा



**मुंबई** : राज्यातील शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. त्यांनी तुकडेबंदी कायदा शिथिल करण्याची घोषणा केली असून, यामुळे सुमारे ५० लाख शेतकऱ्यांना थेट फायदा होणार आहे. १ जानेवारी २०२५ पर्यंत झालेले जमिनीचे तुकडे, आता कायदेशीर व्यवहारात आणता येणार आहेत.

निर्णयासाठी महसूल, नगरविकास आणि जमाबंदी आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठित केली जाणार आहे. ही समिती पुढील १५ दिवसांत एक एसओपी तयार करणार आहे. तसेच नागरिकांनी या काळात आपल्या सूचनाही देण्याचे आवाहन बावनकुळे यांनी केले आहे.

विधानसभेत आमदार अमोल खताळ यांच्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मंत्री चंद्रशेखर बावनकुळे बोलत होते. राज्यात अनेक भागांमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियमामुळे व तुकडेबंदी कायद्याचे उल्लंघन झाले असून, नागरिकांच्या मालमत्तांवर नोंदणीसह अन्य पान ४

### अवैध बांधकामे, प्लॉटिंग कायदेशीर होणार

महसूल मंत्री बावनकुळे यांनी स्पष्ट केले की, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत, प्राधिकरण क्षेत्रे, तसेच गावठाणालगत २०० ते ५०० मीटर पर्यंतचा भाग या निर्णयात समाविष्ट केला जाणार आहे. पुढील चर्चेनुसार, महानगरपालिकांच्या सीमेलगत दोन किलोमीटर पर्यंतचा भाग देखील एसओपीमध्ये विचारात घेतला जाणार आहे. सध्या ५० लाखांहून अधिक कुटुंबांना तुकडेबंदी कायद्यामुळे अडचणींना सामोरे जावे लागत आहे. याचा विचार करून, शासनाने ठरवले आहे की १ जानेवारी २०२५ पर्यंत झालेले तुकडे ‘‘एक गुंठा‘‘ आकारापर्यंत कायदेशीर केले जातील. या निर्णयामुळे नागरिकांना रजिस्ट्री, बांधकाम परवाने व मालकी हक्क मिळवणे शक्य होईल.

# सीएमनी गायकवाडांचे कान टोचले

जनता आवाज वृत्तसेवा

**मुंबई** : शिंदेंच्या शिवसेनेचे आ. संजय गायकवाड यांनी आकाशवाणी आमदार निवासच्या कॅन्टीनमध्ये शिळं अन्न दिले जात असल्याच्या कारणावरून कँटिन कर्मचाऱ्याला मारहाण केली. या घटनेचा आणि गोंधळाचे व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहे. त्यानंतर काल हा मुद्दा ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी विधानपरिषदेत उपस्थित केला. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर देतांना आ. गायकवाड यांचे कान टोचले आहेत.



आ. गायकवाड यांच्या मारहाणीचा मुद्दा उपस्थित करण्यात आल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मी त्याची माहिती घेतली आणि तो व्हिडीओ मी स्वतः बघितला आहे. अशा प्रकारचे वर्तन आपल्या कुणासाठीही भूषणावह नाही. याच्याने विधिमंडळाची आणि आपल्या सगळ्यांची आणि आमदारांची प्रतिष्ठा, प्रतिमा कमी होते. माहिती अशी आली की आमदार निवासातील व्यवस्था नीट नव्हती. भाजी वास मारत होती. या सगळ्या गोष्टीची पान ४



# ‘कर्जमुक्तीसाठी सद्बुद्धी दे’

जनता आवाज वृत्तसेवा

**टाकळीभान** : शेतकऱ्यांने बहूकष्टातून पीकविलेल्या शेत मालाला हमीभाव मिळत नाही. यामुळे शेती व्यवसाय पूर्णतः तोट्यात गेला आहे. सत्ताधाऱ्यांनी दिलेल्या निवडणूक पूर्वी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू, या आश्वासनाला एक वर्ष पूर्ण झाले. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांचे कर्जमुक्तीसाठी विठ्ठलाने आषाढी एकादशी निमित्ताने राज्यकर्त्यांना सद्बुद्धी देवो, असे प्रतिपादन शेतकरी संघटना राष्ट्रीय उपाध्यक्ष ॲड. अजित काळे यांनी केले.

प्रति पंढरपूर टाकळीभान येथील यादव कालीन श्री विठ्ठल-रुख्मिणी मंदिरात पान ४

# बारस्करांमुळे रस्त्याचा प्रश्न निकाली



जनता आवाज वृत्तसेवा

**अहिल्यानगर** : प्रभाग क्रमांक एक हा नव्याने विकसित होणारा भाग असून माजी विरोधी पक्ष नेते संपत बारस्कर यांच्या नेतृत्वाखाली नियोजनबद्ध व कायम स्वरूपीची विकास कामे मार्गी लागत असल्यामुळे ती कामे पुन्हा पुन्हा करण्याची वेळ आपल्यावर येणार नाही असे नियोजन केलेले आहे.

नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांपासून कामे केली जात असल्यामुळे या भागांमध्ये नागरिक मोठ्या संख्येने वास्तव्यास येत आहे गावडे मळा परिसरामध्ये अनेक वर्षांपासून पावसाच्या पाण्याचा व रस्त्यांचा प्रश्न प्रलंबित होता. तो आ. संग्राम जगताप व संपत बारस्कर यांच्या पान ४

> गावडे मळा परिसरातील नागरिकांचा पावसाच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर होता. पाऊस झाला की, सर्व पाणी शुक्लेश्वर मंदिर परिसरामध्ये राहणाऱ्या नागरिकांच्या घरामध्ये जात होते. त्यामुळे नागरिकांची आर्थिक नुकसान होत होती. संपत बारस्कर व डॉ. सागर बोरुडे यांच्याकडे नागरिकांनी पाठपुरावा केल्यानंतर त्यांनी या परिसरातील विविध विकासाचे कामे मार्गी लावले आहे.
>
> **- सचिन कुसळकर**

# ...तर महाविकास आघाडी फुटणार?
## माजी मुख्यमंत्र्यांचे सूचक विधान



जनता आवाज वृत्तसेवा

**मुंबई** : ठाकरे बंधू एकत्र येत असतील तर त्यांचे स्वागतच आहे. आगामी निवडणुका ते एकत्र लढणार असतील तर त्याचेही स्वागत आहे, पण यामुळे एक पक्ष कमी होईल, असे सूचक विधान महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा ज्येष्ठ काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केले आहे. चव्हाण यांच्या या विधानामुळे ठाकरे बंधूंनी आगामी निवडणुका एकत्र लढण्याची घोषणा केली, तर महाविकास आघाडी फुटणार? असे मानले जात आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मराठीच्या मुद्यावर एकत्र येण्याची घोषणा केली आहे. आता हे दोन्ही बंधू आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक पान ४

### ..त्यांना विचारसरणी मान्य नाही?

काँग्रेस पक्षाची भूमिका अशी आहे की आमची आघाडी इंडिया आघाडीतील घटक पक्षांसोबत आहे. यात उद्धव ठाकरे व शरद पवारांच्या पक्षांचा समावेश आहे. त्यांना इतर कोणत्याही पक्षासोबत किंवा समान विचारसरणीच्या पक्षाशी युती करायची असेल तर तो त्यांचा मुद्दा आहे. पण आघाडीतील घटकपक्षांना काँग्रेसच्या विचारसरणीला, धर्मनिरपेक्षतेच्या विचारसरणीला व डॉ. आंबेडकर यांनी संविधानात नमूद केलेल्या विचारसरणीला मुलभूतपणे विरोध करणाऱ्या लोकांसोबत युती करायची असेल तर ते आम्ही स्वीकारणार नाही, असे पृथ्वीराज चव्हाण म्हणाले.

# १५ जुलैपासून पाणी सुटणार
## मंत्री राधाकृष्ण विखे पाटील; अधिकाऱ्यांना दिले निर्देश

जनता आवाज वृत्तसेवा

**शिर्डी : निळवंडे धरणाच्या डाव्या आणि उजव्या कालव्यांना १५ जुलैपासून पाणी सोडण्याचे निर्देश जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत.**



### खरीप पीकांना धोका पोहचण्याची शक्यता

पाणी डाव्या आणि उजव्या कालव्याना मिळावे, अशी मागणी लाभक्षेत्रातील लोकप्रतिनिधी आणि शेतकरी यांच्याकडून करण्यात येत होती. धरण क्षेत्रात पावासाचे प्रमाण अधिक असले तरी अद्यापही लाभक्षेत्रातील तालुक्यात अपेक्षे इतका पाऊस न झाल्याने खरीप पीकांना धोका पोहचण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

धरणाच्या लाभक्षेत्रात मोठ्या स्वरुपात झालेल्या पावसाने निळवंडे धरणात पाणी साठा समाधानकारक झाला आहे. मात्र धरणातील पाण्याची पातळी राखण्यासाठी धरणातून सध्या पाणी सोडण्यात आले आहे.

निर्माण झालेल्या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेवून जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विभागाच्या अधिकाऱ्यांशी धरणातील पाणी साठ्या संदर्भात सर्व माहिती घेवून येत्या १५ जुलै २०२५ पासून आवर्तन सुरू करण्याच्या सूचना दिल्या.

मंत्री विखे पाटील यांच्या निर्णयामुळे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून गावातील पाणी योजनांना देखील आवर्तनाचा लाभ मिळणार असल्याने शेती बरोबरच पिण्याच्या पाण्याची समस्या सुटण्यास मोठी मदत होणार आहे.

## संमिश्र

### धस यांच्या मुलाची जामिनावर सुटका

जनता आवाज वृत्तसेवा

**मुंबई** : अहिल्यानगर जिल्ह्यातील एका अपघात प्रकरणात माजी मंत्री सुरेश धस यांच्या मुलावर गुन्हा दाखल झाला आहे. या अपघातात शेळके नावाच्या एका तरुणाचा मृत्यू झाला असून, धस यांचा मुलगा या घटनेवेळी वाहन चालवत होता. या संदर्भात स्पष्टीकरण देताना सुरेश धस यांनी सांगितले, माझ्या मुलावर रीतसर गुन्हा दाखल झाला आहे. तो मुंबईला एका ट्रिटमेंटसाठी निघाला होता. वाटेत अहिल्यानगर जिल्ह्यात अपघात झाला. या अपघातात दुर्दैवाने शेळके नावाच्या तरुणाचा मृत्यू झाला आहे. मात्र, माझ्या मुलाला कोणतंही व्यसन नाही. त्यामुळे ड्रिंक अँड ड्राईव्हचा अजिबात संबंध नाही.

### डॉक्टरने भर रस्त्यात स्वतःला घेतले पेटवून

जनता आवाज वृत्तसेवा

**बुलढाणा** : कौटुंबिक कलहाला कंटाळून एका डॉक्टरने भररस्त्यात स्वतःला पेटवून घेतल्याची भयंकर घटना बुलढाणा जिल्ह्यातील आलमपूर फाट्यावर घडली. उपस्थित नागरिकांनी धाडस दाखवून या व्यक्तीची आग विझवली. त्यानंतर त्या डॉक्टरला लगतच्या रुग्णालयात दाखल केले. तिथे त्यांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे.

### अमेरिकेत पुरामुळे चक्क घरे गेली वाहून


जनता आवाज वृत्तसेवा

**सांता फे** : काल झालेल्या मुसळधार पावसानंतर अमेरिकेतील न्यू मेक्सिको राज्यातील अनेक भागांत अचानक पाणी साचले. सर्वात जास्त नुकसान झालेल्या भागात रुईडोसो नावाचे डोंगराळ गाव होते. येथील प्रवाह इतका जोरदार होता की अनेक घरे वाहून गेली आणि अनेक लोक अडकून पडले. मदत आणि बचाव पथके सतत काम करत आहेत.

### पुण्यात विवाहितेवर धर्मांतरासाठी दबाव

जनता आवाज वृत्तसेवा

**पुणे** : पुणे शहरातल्या समर्थ पोलिस ठाणे हद्दीत एका १९ वर्षीय विवाहितेवर ख्रिश्चन धर्म स्वीकारण्यासाठी मानसिक आणि शारीरिक दबाव आणल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. सासरच्या मंडळींकडून वारंवार धर्मांतरासाठी तगादा लावण्यात येत असल्याने महिलेने पोलिसांत धाव घेवून गुन्हा दाखल केला.



# अस्वच्छ शहराला मनपा आयुक्त जबाबदार

## नागरिकांचे आरोग्य धोक्यात; साथीच्या आजारांमध्ये मोठी वाढ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** गेल्या काही दिवसांपासून शहराला अस्वछतेने विळखा घातलेला आहे. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. शहरात साथीचे आजार पसरण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे. महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडून ठोस कारवाई होत नसल्याने शहर अस्वच्छ झालेले आहे, असा आरोप आता महापालिकेचे माजी पदाधिकाऱ्यांसह नगरकर करीत आहेत.

### प्रशासनाची बोटचेपी धोरण

शहरात रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या व शहर अस्वच्छ करणाऱ्यांना लगाम लावण्यासाठी शहराच्या विभागनिहाय एका पथकाची निर्मिती करण्याची गरज असल्याची नागरिकांमध्ये चर्चा आहे. उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर महापालिकेच्यावतीने कोणत्याच स्वरूपाची कारवाई होत नसल्याने याचे प्रमाण वाढू लागले आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिक करत आहे




महापालिकेतील सर्वच भागात कचऱ्याचे ढिगारे साठलेले दिसून येत आहे. हा प्रकार गेल्या अनेक दिवसांपासून सुरु आहे. याबाबत नागरिकांसह महापालिकेच्या माजी पदाधिकाऱ्यांनी महापालिका आयुक्तांकडे तक्रारी केलेल्या आहेत. परंतु या तक्रारींची दखल मात्र गांभिर्याने घेतलेली नसल्याने शहरात अवस्छतेत वाढ झालेली आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस सुरु आहे. साठलेल्या कचऱ्यातून दुर्गंधी पसरली आहे. कचऱ्याचे ढिगारे असलेल्या परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. असे असतानाही त्याकडे मनपा प्रशासनाने दुर्लक्ष केलेले आहे.

महापालिकेच्या माजी पदाधिकारी व नगरसेवकांनी मनपाच्या अनागोंदी कारभाराबाबत अनेकदा आवाज उठविलेला आहे. परंतु मनपा प्रशासनाने सध्या झोपेचे सोंग घेतलेले आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. उध्दव ठाकरे गटाचे किरण काळे यांनी स्वच्छतेबाबत आवाज उठवूनही प्रशासनाने स्वच्छता मोहीम राबवलेली नाही. त्यामुळे महापालिकेचे प्रशासक शहर स्वच्छ कधी करतील? असा सवाल आता नागरिकांमधून केला जात आहे. शहरात असलेल्या अस्वच्छतेबाबत प्रतिक्रियेसाठी मनपा आयुक्तांशी संपर्क साधला असता संपर्क होऊ शकला नाही. शहरातील काही नागरिक तसेच रात्रीच्या वेळेस व्यवसाय करणारे चायनीज, अंडाभुर्जी टपरी चालक तसेच फळ व भाजी व्यवसायिक कचरा थेट रस्त्यावर किंवा रस्त्याच्या कडेला टाकत आहेत. त्यामुळे दुर्गंधी पसरली आहे. तसेच कचरा मोकाट जनावरे, भटक्या श्वानांमार्फत रस्त्यावर पसरत आहे. यामुळे शहराचेही विद्रुपीकरण होऊ लागले असून आजुबाजूच्या नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे.

### ठेकेदारावर कारवाई केली का?

कचरा संकलन करण्यासाठी ज्या ठेकेदाराला ठेका दिलेला आहे. त्याने कचरा अनेकदा शहरात संकलीत केलेला नाही. त्यामुळे असा ठेकेदारावर कारवाई होणे अपेक्षीत होते. मात्र महापालिका प्रशासनाने कारवाई केली नसल्याने ठेकेदाराचा मनमानी कारभार सध्या सुरु आहे. त्यामुळेच शहर अस्वच्छ दिसून येत आहे.

---

# प्रवरेच्या पुरामुळे ओझरचा पुल पाण्याखाली

## ओझर बुद्रुक व खुर्दचा तुटला संपर्क; नागरिकांचे हाल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** अकोलेतील भंडारदरा तसेच हरिश्चंद्रगड परिसरात होणाऱ्या पावसामुळे धरणसाठ्यात पाणी होत असल्याने धरणातून प्रवरा नदीत मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरू आहे. त्यामुळे ओझर येथील पुल पाण्याखाली गेल्याने ओझर बुद्रक व ओझर खुर्द या दोन गावांच संपर्क तुटलेला आहे.

प्रवरानदीचा उगम अहिल्यानगर जिल्ह्यातील रतनगड येथील असुन हिला मुळा, आढळा, म्हाळुंगी या उपनद्या असून ही नदी पुढे गोदावरीला जाऊन मिळते. प्रवरानदीच्या किनाऱ्यावर अकोले, संगमनेर, आश्वी बुद्रुक कोल्हार, बेलापूर, नेवासा ही प्रमुख गावे आहेत. नदी रतनवाडीला उगम पावून गोदावरी नदीस मिळते.

प्रवरा नदी भंडारदरा धरणा पासून ते ओझर पर्यंत कालवा मानली जाते. तिथ पासून नदीचे दोन कालवे निघतात. संगमनेर, अकोले व श्रीरामपूर तालुक्यातील लोकांची जीवनदायी असलेल्या प्रवरा नदीला अमृतवाहिनी असेही म्हणले जाते. संगमनेर येथून निघून वाघापूर, जोर्वे, ओझर असा प्रवास करून ओझर येथे धरणात तिचे पाणी अडविले जाते. या धरणातून निघणाऱ्या डाव्या व उजव्या कालव्यातून संगमनेर व श्रीरामपूर तालूक्यातील शेतीला पाणी दिले जाते. प्रवरा नदी प्रवरा संगम येथे गोदावरी नदीला मिळते.

पुलाची उंची कमी असल्या कारणामुळे गेल्या दोन दिवसांपासून ओझर बुद्रुक व ओझर खुर्द येथील या गावा जोडणारा पाण्याखाली गेला आहे. ओझर बुद्रुक येथे इयत्ता ५ ते १० वी ची खाजगी शाळा असुन विशेषता या शाळे मध्ये ओझर खुर्द येथील मुले शिक्षणासाठी जात असतात. त्यामुळे येथे उंच स्वरूपाचा पुल तयार होणे आवश्यक आहे.

**–सरूनाथ उंबरकर,**
माजी विरोधी पक्ष नेते पंचायत समिती.



# बाबासाहेब चव्हाण यांचे निधन

**जनता आवाज वृत्तसेवा**



**कोपरगाव :** तालुक्यातील धोत्रे येथील लक्ष्मण अशोक चव्हाण यांचे बंधू तर नैतिक बाबासाहेब चव्हाण यांचे वडील बाबासाहेब अशोक चव्हाण यांचे नाशिक येथे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे. निधन समयी त्यांचे वय (वर्ष ४०) होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक भाऊ, दोन बहिणी असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर धोत्रे अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले त्यावेळी मोठा जनसमूह उपस्थित होता. त्यांच्या निधनाबद्दल कोपरगाव तालुक्यासह धोत्रे येथे हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# ... अखेर डॉ. सुजय विखेंच्या पाठपुराव्याला यश

## दिलीप भालसिंग; मात्र लंकेंकडून श्रेय लाटण्याचे राजकारण सुरूच

**जनता आवाज वृत्तसेवा**



**अहिल्यानगर :** पुणे-अहिल्यानगर या महत्वाकांक्षी रेल्वेमार्गाच्या डीपीआरचा (सविस्तर प्रकल्प अहवाल) रेल्वेच्या बांधकाम विभागाकडून सर्वेक्षण पूर्ण करून रेल्वे बोर्डाकडे सादर करण्यात आला आहे. हा अहवाल सादर होणं म्हणजे या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीकडे टाकलेलं एक मोठं पाऊल आहे. या यशामागे माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न केले असताना खा . निलेश लंके श्रेय लाटण्याचे राजकारण करत असल्याचे मत भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग , शहर जिल्हाअध्यक्ष अनिल मोहिते यांनी व्यक्त केले .

खा . निलेश लंके यांनी स्वतः श्रेय घेण्यापेक्षा पंतप्रधान नरेंद्र मोदी व तत्कालीन खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांचे आभार मानायला हवे. संसद अधिवेशनात डॉ. विखेंनी सातत्याने हा प्रश्न मांडला, मंत्र्यांच्या भेटी घेतल्या, त्याचा हा परिपाक आहे. डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिल्लीमध्ये रेल्वेमंत्री मा. अश्विनी वैष्णव यांची वेळोवेळी भेट घेऊन या प्रकल्पाची निकड मांडली होती. केंद्र सरकार आणि रेल्वे मंत्रालयाने या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत डीपीआर तयार करण्याचे आदेश दिले होते. मंत्री अश्विनी वैष्णव यांनीही या मार्गिकेच्या लवकरात लवकर अंमलबजावणीसाठी प्रयत्नशील राहण्याचं आश्वासन दिलं होतं, हे विसरता कामा नये.

भालसिंग यांनी पुढे टोला लगावत म्हटलं, श्रेय लाटण्याची सवय असणाऱ्यांनी कृपया यावेळी तरी मूळ प्रयत्नकर्त्यांचा सन्मान करावा. आयत्या पिठावर रेघोट्या ओढण्याचा मोह टाळून, वस्तुस्थिती स्वीकारावी हीच अपेक्षा असल्याचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग सांगितले .

---

# पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांची दालने रिते

## शेतकऱ्यांचा खोळंबा; कामे खोळंबत असल्याने संताप

**जनता आवाज वृत्तसेवा**


**कर्जत :** कर्जत पंचायत समिती अंतर्गत असलेल्या पशुसंवर्धन विभागात कार्यालयीन वेळेमध्ये एकही अधिकारी अथवा कर्मचारी उपस्थित नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे. यामुळे तालुक्यातील विविध गावांमधून आपल्या कामासाठी आलेल्या शेतकऱ्यांना निराश होऊन परत जावे लागले.

शासकीय कार्यालयात कार्यालयीन वेळेत अधिकारी व कर्मचारी हजर असणे हे मूलभूत कर्तव्य असताना, या विभागात शुकशुकाट दिसून आल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली. अनेक शेतकरी आपल्या विविध कामांसाठी आणि माहितीसाठी किंवा इतर आवश्यक कामांसाठी येथे आले होते. मात्र, कार्यालयामध्ये कुणीही हजर नसल्याने त्यांची फरपट झाली. बराच वेळ त्यांना ताटकळत थांबावे लागले होते.

या प्रकारामुळे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आणि कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडून कोणतीही कारवाई केली जाणार का? असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे.

### प्रशासनाने गंभीर दखल घ्यावी

नियमानुसार, शासकीय कार्यालयात अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती नोंदवली जाणे आवश्यक असून, अशी हलगर्जी नागरिकांच्या सेवेला अन्यायकारक ठरत आहे. प्रशासनाने याची गंभीर दखल घेऊन संबंधित जबाबदारांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी तालुक्यातील नागरिक, शेतकरी व सामाजिक कार्यकर्त्यांकडून होत आहे.



# विद्यार्थी घडविण्यात प्रवरा पब्लिकचे योगदान

## डॉ. राहुल शिंदे; प्रवरा पब्लिक स्कूलचा वर्धापन दिन उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** प्रवरा शैक्षणिक संकुलाने इंग्रजी माध्यमाच्या शाळा ग्रामीण भागात सुरु करुन ग्रामीण विद्यार्थ्यांच्या पंखात बळ दिले आहे. प्रवरेचे विद्यार्थी शिक्षणातून जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचले आहेत, असे प्रतिपादन माजी विद्यार्थी आणि प्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉ. राहुल शिंदे यांनी केले.

लोकनेते पद्मभूषण डॉ बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा पब्लिक स्कूलचा ६१ वा वर्धापन दिनानिमित्त आयोजित




कार्यक्रमात डॉ. शिंदे बोलत होते. यावेळी राहाता पंचायत समिती शिक्षणाधिकारी राजेश पावसे, शाळेचे प्राचार्य डॉ बी बी अंबाडे, उपप्राचार्य के. टी. अडसूळ, पर्यवेक्षिका एम. एस. जगधने, शुभांगी रत्नपारखी आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. शिंदे म्हणाले की, पद्मभूषण पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील आणि पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी सहकार, कृषि, शिक्षण, आरोग्य आणि ग्रामीण विकासातून या भागामध्ये परिवर्तन केले हेच काम जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे पुढे नेत आहेत. प्रवरा शैक्षणिक संकुलाच्या माध्यमातून विविध उपक्रमातून शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांच्या प्रयत्नातून सक्षम विद्यार्थी घडत आहे. राजेश पावसे,डॉ. बी. बी. अंबाडे यांनी मनोगत व्यक्त केले.

---

# आशा सेविकांचा पंचायत समितीवर मोर्चा

## कामगारांच्या देशव्यापी संपात घेतला सहभाग

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस, केंद्रीय कामगार संघटना आणि संयुक्त किसान मोर्चा यांनी पुकारलेल्या देशव्यापी संपामध्ये कर्जत तालुक्यातील आशा सेविका आणि गटप्रवर्तकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यानिमित्त येथील पंचायत समिती व तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. यावेळी दिलेल्या घोषणाबाजीने परिसर दणाणला होता.




या आंदोलनाचे नेतृत्व तालुका अध्यक्ष लंका पठाडे यांनी केले. त्यांनी सांगितले की, आशा सेविकांना मिळणारे मानधन वेळेवर मिळावे, त्यांच्या समस्या गांभीर्याने ऐकून घेतल्या जाव्यात आणि आरोग्य खात्याच्या तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी सकारात्मक भूमिका घ्यावी व पुढील काळामध्ये आशा सेविकांची निराशा करू नका. पुन्हा एकदा आंदोलनाची हत्यार उपसले जाईल, असा इशारा व ती पठाडे यांनी दिला.

जिल्हा उपाध्यक्षा नाजिया पठाण यांनी केंद्रांवरील अडचणी आणि आशा सेविकांच्या समस्या मांडल्या. तालुकाध्यक्ष लंका पठाडे, राणी गदादे, , सारिका शिंदे, रोहिणी नलवडे, इर्शाद बेग, इंदू चव्हाण, रेखा देवकर, सुनिता गोडसे, माधुरी भगत, संगीता कानडे, स्वाती काळे, गवळी, आशा साबळे,आदींचा समावेश होता.

# वनकुट्यात आजपासून हरिनाम सप्ताह

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वनकुटे :** ह.भ.प. नाना महाराज वनकुटेकर यांच्या कृपा आशीर्वादाने व वारकरी बांधवांच्या सहकार्याने हभप बाळकृष्ण महाराज कांबळे, एकनाथ महाराज शास्त्री चत्तर, नारायण महाराज गागरे यांच्या मार्गदर्शनाखाली वनकुटे येथे गुरूवार दि. १० जुलैपासून विठ्ठल रखुमाई अखंड हरिनाम सप्ताह तसेच ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने सद्गुरू नाना महाराज वनकुटेकर पुण्यतिथी सोहळयाचेही आयोजन करण्यात आले आहे.

आज सकाळी १० ते १० दरम्यान हभप बाळकृष्ण महाराज कांबळे यांच्या किर्तनाने या सप्ताहास प्रारंभ होईल. याच दिवशी सायंकाळी ७ ते ९ दरम्यान समाजप्रबोधनकार निवृत्तीमहाराज देशमुख इंदुरीकर यांचे किर्तन होणार आहे. या सप्ताहात शुक्रवार दि.११ जुलै पासून दररोज सायंकाळी सात ते रात्री ११ दरम्यान किर्तन सेवा पार पडणार आहे.

स्वामी दत्तागिरी माणिकबाबा, ईश्वर महाराज कदम शास्त्री, गणेश महाराज शिंदे, रामेश्वर महाराज पवार, हरिदास महाराज पालवे एकनाथ महाराज चत्तर शास्त्री, देवीदास महाराज म्हस्के, अक्षय महाराज उगले यांची किर्तनसेवा होणार आहे. शनिवार दि.१९ रोजी सकाळी १० ते १२ दरम्यान बाळकृष्ण महाराज कांबळे यांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे.

# भाजप राज्य परिषदेच्या सदस्यपदी खंडाळे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** भाजपच्या महाराष्ट्र राज्य परिषदेच्या सदस्यपदी नेवासा येथील भाजपचे जेष्ठ कार्यकर्ते रामचंद्र खंडाळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सलग चाळीस वर्षे भाजपमध्ये एकनिष्ठ राहून पक्ष संघटनेसाठी देत असलेल्या योगदानाबद्दल त्यांची भाजपच्या महत्वाच्या असलेल्या राज्य परिषदेवर ही निवड करण्यात आली आहे.




भारतीय जनता पक्षाचे जेष्ठ नेते म्हणून ओळख असलेल्या रामचंद्र खंडाळे यांची भाजपा महाराष्ट्र राज्य परिषदेवर नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा भाजपच्या नेवासा शहर कार्यालयामध्ये सत्कार करण्यात आला. यावेळी भाजपा शहराध्यक्ष मनोज पारखे, भाजपचे प्रदेश सचिव निरंजन डहाळे, भाजपचे माजी तालुकाध्यक्ष दिनकरराव गर्जे, जेष्ठ कार्यकर्ते अ‍ॅड.संजीव शिंदे यांच्या हस्ते खंडाळे यांचा सत्काराद्वारे सन्मान करण्यात आला.

### कार्यक्रमास यांची होती उपस्थिती

भाजप कार्यालयात झालेल्या सत्कार कार्यक्रम प्रसंगी देवगाव सोसायटीचे चेअरमन कुंदनलाल भंडारी, राजेश कडु, आदिनाथ पटारे, अ‍ॅड. ज्ञानेश्वर विधाटे, राजेंद्र मुथा, अ‍ॅड. गोविंद जगताप, शिवाजी लष्करे, ऋषिकेश शहाणे, लक्ष्मण मोहीटे, चांगदेव दारुंटे, मानव साळवे, याकुब शेख आदी उपस्थित होते.

---

# महानगरपालिका कामगार युनियनच्यावतीने निदर्शने

## सरकारचा कामगार चळवळ मोडीत काढण्याचा डाव; वायकर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** देशव्यापी संपाच्या पार्श्वभूमीवर देशातील दहा केंद्रीय कामगार संघटना व क्षेत्रवार महासंघ यांच्या अखिल भारतीय संयुक्त मंचाच्या वतीने सार्वत्रिक संप पुकारलेला आहे. सदर संपामध्ये केंद्रीय कामगार कर्मचारी कृती समितीच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य सर्व श्रमिक महासंघाची संलग्न असलेली अहिल्यानगर महानगरपालिका कामगार कर्मचाऱ्यांनी आजच्या देशव्यापी सार्वत्रिक संपामध्ये सहभागी होऊन महापालिका प्रशासकीय कार्यालयाच्या आवारात निदर्शने करून उपायुक्त विजयकुमार मुंडे यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी सचिव कॉम्रेड आनंद वायकर, अध्यक्ष जितेंद्र सारसर, कार्याध्यक्ष नंदकुमार नेमाने, राहुल साबळे, विठ्ठल उमाप, बलराज गायकवाड, ऋषिकेश भालेराव, संदीप चव्हाण, बाबासाहेब राशिनकर, उपाध्यक्ष अंतवन क्षेत्रे, प्रकाश साठे, भास्कर आकुबत्तीन, सागर साळुंके, सतीश ताठे, कविता खिल्लारी सहचिटनीस सोनू चौधरी, ओंकार कराळे, ओंकार ढोणे, योगेश पंडित आदी उपस्थित होते.

आकृतीबंधाप्रमाणे महानगरपालिकामध्ये कर्मचारी भरती करावी, समान कामाला समान वेतन लागू करावे, रद्द केलेली पदे पुन्हा जिवंत करून त्यावर भरती करावी, आऊटसोर्सिंग व कंत्राटी पद्धत थांबवावी. जुनी पेन्शन योजना पुन्हा सुरु करा, विना योगदानावर आधारित जुनी पेन्शन योजना ही कर्मचाऱ्यांचे निवृत्तीनंतरचे भविष्य सुरक्षित करणारी होती. नव्या पेन्शन योजनेत भविष्याची शाश्वती नाही. म्हणून जुनी योजना पुन्हा सुरू करून ती सर्व कर्मचाऱ्यांवर लागू करावी, लाड-पागे समितीच्या शिफारशींची काटेकोर अंमलबजावणी करा. कामगारांच्या सेवा अटी, वेतन, स्थायित्व याबाबत लाड-पागे समितीने महत्वाच्या शिफारशी केल्या आहेत. या शिफारशी रखडलेल्या आहेत.

कॉम्रेड आनंद वायकर म्हणाले की, केंद्र सरकारने कामगार कायद्याचे बिल पास केले असून पूर्वीचे कामगारांबाबत असणारे सर्व कायदे चार संहितामध्ये आणले आहे. कामगारांच्या बाजूने जेवढे कायदे होते, तेवढे काढून उद्योजकांच्या फायद्यासाठीचे कायदे तयार केले आहे, केंद्र सरकारने राज्य सरकारला निर्देश देऊन रुल तयार करण्याचे सांगितले होते त्यानुसार तयार देखील झाले आहे. आता फक्त अंमलबजावणी करायची आहे. कामगार संघटनाना संप करायचा अधिकार राहणार नाही, तसेच कोर्टात जाण्यासाठीची तरतूद देखील राहणार नाही.

निवेदनात पुढे म्हणाले की, कामगार हक्क, लोकशाही संरक्षण आणि सामाजिक न्यायासाठी सध्या



देशभरात संतप्त लाट उसळताना दिसत आहे. केंद्र व राज्य सरकारकडून राबवण्यात येणाऱ्या कामगारविरोधी धोरणांमुळे श्रमिकांच्या जगण्याचा मूलभूत अधिकारच धोक्यात आला आहे. याच पार्श्वभूमीवर विविध संघटनांकडून ११ प्रमुख मागण्यांसह सरकारला थेट इशारा देण्यात आला आहे.

# संपादकीय

## करमुक्त देशही कर लादणार?

आखाती देशांमध्ये प्रथमच ओमानने आपल्या नागरिकांवर प्राप्तिकर लादण्याचा निर्णय घेतला आहे. ओमान सरकारच्या घोषणेनुसार, २०२८ पासून वार्षिक उत्पन्न १,०९,००० डॉलर किंवा त्याहून अधिक असणाऱ्यांकडून पाच टक्के प्राप्तिकर वसूल केला जाणार आहे. अशा प्रकारे सध्या ओमानच्या फक्त एक टक्के लोकांकडून उत्पन्न कर वसूल केला जाईल. ओमानशिवाय इतर आखाती देश त्यांच्या नागरिकांवर कर लादण्याचा विचार करत आहेत की नाही हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने असे भाकित केले आहे की येत्या काही वर्षांमध्ये आखाती देश उत्पन्नात विविधता आणण्यासाठी नागरिकांकडून कर आकारण्यास सुरुवात करतील. सध्या ओमानचा ८५ टक्के महसूल तेल उद्योगातून येतो. आखाती देशांमध्ये कोणताही कर लागत नसल्यामुळे जगभरातील लोक या देशांकडे आकर्षित झाले आणि गुंतवणूक केली. ओमानच्या अर्थमंत्र्यांनी सांगितले, की जागतिक ऊर्जा बाजारपेठांमधील चढउतारामुळे ओमानने तेलावरील आपले महसूल अवलंबित्व कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या ओमानचा ८५ टक्के महसूल तेल आणि वायूच्या विक्रीतून येतो. ओमान बऱ्याच काळापासून नागरिकांवर उत्पन्न कर लादण्याचा विचार करत होता. २०२० मध्ये ओमानने आपल्या अर्थव्यवस्थेत अनेक बदल केले. त्यात जनतेवरील कर्ज कमी करणे आणि आर्थिक वाढीला चालना देण्याचा विषय समाविष्ट होता. ओमान आपल्या २०४० पर्यंतच्या नियोजनाअंतर्गत हे बदल करत आहे. ओमान आपल्या देशाची अर्थव्यवस्था तंत्रज्ञानावर आधारित बनवू इच्छितो. ओमान हा 'गल्फ कोऑपरेशन कौन्सिल' (जीसीसी)चा पहिला सदस्य बनणार आहे, जिथे जास्त उत्पन्न असलेल्या लोकांना उत्पन्न कर भरावा लागेल. सरकारच्या घोषणेनुसार ४२ हजार ओमानी रियाल (सुमारे ९३.५ लाख रुपयां) पेक्षा जास्त वार्षिक उत्पन्नावर पाच टक्के कर आकारला जाईल. हा कर ओमानी नागरिकांसह देशात काम करणाऱ्या परदेशी लोकांनाही लागू होईल. 'जीसीसी' चे उर्वरित पाच सदस्य देश तेल आणि वायूने समृद्ध आहेत आणि तिथे वैयक्तिक उत्पन्नावर कोणताही कर आकारला जात नाही. या करमुक्त वातावरणामुळे सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती आणि कतार सारखे देश परदेशी कामगारांसाठी आकर्षक बनतात. २०२४ मध्ये ओमानच्या एकूण सरकारी उत्पन्नाचा मोठा भाग म्हणजे सुमारे १९.३ अब्ज डॉलर तेलातून आला; परंतु अर्थमंत्री सईद बिन मोहम्मद अल-सकरी म्हणतात की या नवीन करामुळे सरकारी महसुलाच्या स्रोतांमध्ये विविधता येईल आणि तेलावरील अवलंबित्व कमी होईल. ओमानकडे इतर आखाती देशांपेक्षा कमी संसाधने आहेत. त्यामुळे अंतर्गत आणि बाह्य दबावांमुळे हा कर लागू करण्यात आला आहे. अनेक दशकांपासून कच्च्या तेलावर अवलंबून राहिल्यामुळे ओमानच्या अर्थव्यवस्थेला मोठ्या चढउतारांना सामोरे जावे लागत आहे. सार्वजनिक कर्जात वाढ आणि कल्याणकारी योजनांवरील वाढता खर्च हीदेखील यामागील कारणे आहेत. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीसारख्या संस्थांच्या शिफारशींमुळे ओमानला पारदर्शक आर्थिक सुधारणांकडे वाटचाल करण्यास प्रेरणा मिळाली. हा निर्णय ओमानमध्ये आधीच लागू असलेल्या व्यापक कर रचनेचा भाग बनेल.

ओमानमध्ये आधीच चार प्रकारचे कर लागू आहेत, ते म्हणजे मूल्यवर्धित कर (व्हॅट), कॉर्पोरेट कर, उत्पादन शुल्क कर आणि मिठाईवरील कर. उत्पन्न कर हा या प्रणालीतील शेवटचा आणि आवश्यक दुवा आहे. या कायद्यानुसार, ४२ हजार ओमानी रियालपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्यांना करातून सूट दिली जाईल. त्यामुळे ९९ टक्के लोकसंख्येला नव्या करापासून दूर ठेवले जाईल. यामुळे मध्यम आणि निम्न उत्पन्न गटांवर कोणताही भार पडणार नाही. तथापि, या कराचे काही नकारात्मक परिणामदेखील होऊ शकतात. काही लोक कर टाळण्यासाठी देश सोडून जाऊ शकतात आणि परकीय गुंतवणूकदेखील कमी होऊ शकते; परंतु यामुळे ओमानची आर्थिक पारदर्शकता वाढेल आणि सरकारी खर्चात सुधारणा होईल. सरकारने व्यवसायावर परिणाम न करणाऱ्या करांसह काही सूट आणि प्रोत्साहने द्यावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. उदाहरणार्थ, स्टार्टअप्स, नवोन्मेष आणि परदेशी गुंतवणुकीला कर सवलत देणे. अर्थात आणखी एक भीती आहे, ती म्हणजे लोक कर चुकवण्याचे मार्ग शोधतील. विशेषतः मर्यादित आकाराच्या अर्थव्यवस्थेत देखरेख यंत्रणा मजबूत नसलेल्या ओमानसारख्या देशात हे सहजशक्य आहे. आता ओमानमध्ये काही लोक कर टाळण्यासाठी अकाउंटंट शोधू लागले आहेत. या करामुळे परदेशी गुंतवणुकीवर परिणाम होऊ शकतो आणि ओमानमधून भांडवल बाहेर जाऊ शकते. खऱ्या श्रीमंतांकडून कर वसूल करणे आव्हानात्मक असेल. कारण ते अनेकदा आपले भांडवल परदेशात पाठवतात. सरकारने कॉर्पोरेट कर आणि व्हॅट सारखे विद्यमान कर अधिक प्रभावी करावेत, असा एक पर्याय अर्थतज्ज्ञ सुचवतात. हा कर एक टक्क्याऐवजी सहा टक्के करण्याची शिफारस काही तज्ज्ञ करतात. त्यामुळे सामान्य लोकांवर कमी परिणाम होईल आणि महसूलही वाढू शकेल. आखाती सहकार्य संघटनेच्या उर्वरित सदस्य देशांमध्ये उत्पन्न कराची कोणतीही तरतूद नाही. २०२४ साठी ओमानचा एकूण अर्थसंकल्प सुमारे ३०.२६ अब्ज डॉलर होता. २०२८ पासून लागू होणाऱ्या उत्पन्न करातून मिळणारा अंदाजे महसूल फक्त २३० दशलक्ष डॉलर असेल. कराची उपयुक्तता केवळ आर्थिक फायद्यांमध्येच नाही, तर चांगली देखरेख, डेटा आणि व्यवस्थापनातही आहे. कर पारदर्शक आणि समान पद्धतीने अंमलात आणला गेला, तर सामाजिक न्यायाचे एक महत्त्वाचे साधन बनू शकतो. केवळ उच्च उत्पन्न असलेल्यांवर कर लावल्याने आर्थिक जबाबदारीचे संतुलन दिसून येते; परंतु शिक्षण, आरोग्य आणि राहणीमान सुधारण्यासाठी कर उत्पन्न वापरले जाणे महत्त्वाचे आहे; जेणेकरून लोकांना आपण देशाच्या विकासात योगदान दिले आहे, असे वाटेल. ओमान हे धोरण यशस्वीरित्या अंमलात आणू शकला, तर ते इतर आखाती देशांसाठी एक उदाहरण बनू शकते. 'जीसीसी' देशातील करमुक्त वातावरण हा या देशांच्या गुंतवणूक धोरणाचा आधार आहे. सरकारच्या दृष्टिकोनातून ही करप्रणाली आर्थिक स्थिरता आणि सामाजिक संतुलन आणण्याचा प्रयत्न आहे; परंतु त्याचे गुंतवणूक आणि 'ब्रेन ड्रेन'सारखे संभाव्य नकारात्मक परिणाम वादाचा विषय आहेत. अर्थात ओमानने हा बदल केल्यामुळे इतर देशांवरही असेच करण्याचा दबाव वाढू शकतो.

# केरळचा आदर्श

**राज्यरंग**

**– व्ही. त्यागराजन**

प्रत्येक राज्यातील धोरणकर्त्यांना आणि प्रशासनाला केरळच्या यशोगाथेतून शिकण्याची आणि स्वतःच्या राज्यात डिजिटल साक्षरता वाढवणारे कायदे, धोरणे आणि कार्यक्रम अंमलात आणण्याची प्रेरणा घेणे शक्य आहे. केरळने साक्षरतेपाठोपाठ घालून दिलेला डिजिटल साक्षरतेचा मापदंड देशाने राष्ट्रीय पातळीवर अनुकरणात आणण्याची गरज आहे. केरळने या क्षेत्रात केलेल्या कामगिरीचा हा परिचय.

भारत हे एक विशाल आणि वैविध्यपूर्ण राष्ट्र आहे. ते डिजिटल युगाकडे वेगाने वाटचाल करत आहे. सरकारद्वारे चालवल्या जाणाऱ्या 'डिजिटल इंडिया' सारख्या मोहिमा भारताला तांत्रिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्याचा प्रयत्न करत आहेत. असे असले, तरी आजही देशातील बहुतेक ग्रामीण आणि मागास भागात डिजिटल साक्षरतेचा अभाव हा एक मोठा अडथळा आहे. केरळने मात्र पूर्ण डिजिटल साक्षरता प्राप्त करून या दिशेने एक अभूतपूर्व पाऊल टाकत देशासमोर एक उदाहरण ठेवले आहे. त्याची अधिकृत घोषणा अद्याप झाली नसली, तरी हे लक्षात घेण्यासारखे आहे की या मोहिमेत केरळ राज्याने सुमारे २१ लाख लोकांना डिजिटल साक्षर केले आहे. ही कामगिरी केवळ तांत्रिक दृष्टिकोनातूनच नव्हे, तर सामाजिक, आर्थिक, औद्योगिक आणि शैक्षणिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाची आहे. केरळ राज्याचे हे मॉडेल संपूर्ण भारतात लागू केल्यास दूरगामी परिणाम दिसू शकतील आणि विकसित भारताच्या आपल्या स्वप्नाला पंख देऊ शकतील, असे म्हणणे अतिशयोक्त ठरणार नाही. केरळने डिजिटल साक्षरता ही समाजातील प्रत्येक घटकाला सामावून घेणारी एक व्यापक आणि समावेशक मोहीम म्हणून हाती घेतली. हे काम स्वयंमदत गटांनी सुरू केले. ते डिजी केरळ प्रकल्पापासून सुरू झाले. त्याला देशातील पहिली ग्रामीण डिजिटल साक्षरता योजना म्हणता येईल. या योजनेअंतर्गत राज्यभरात २१ लाखांहून अधिक डिजिटल निरक्षर नागरिकांची ओळख पटवण्यात आली आणि त्यांना संगणक, इंटरनेट आणि डिजिटल सेवांमध्ये यशस्वीरित्या प्रशिक्षण देण्यात आले.

या अतुलनीय प्रयत्नातून राज्याच्या कानाकोपऱ्यात केवळ डिजिटल शिक्षण दिले जात नाही, तर सरकारच्या ई-गव्हर्नन्स सेवा सामान्य लोकांपर्यंत पोहोचवण्यातही महत्त्वपूर्ण योगदान दिले जात आहे. आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या मोहिमेत महिलांचा सहभाग लक्षणीय आहे. 'कुडुम्बश्री'सारख्या महिला सक्षमीकरण गटांना डिजिटल प्रशिक्षण देण्यात आले आणि त्यांच्या समुदायांमध्ये डिजिटल साक्षरता पसरवण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. यामुळे केवळ तांत्रिक ज्ञान पसरले नाही, तर महिलांची सामाजिक भूमिकाही बळकट झाली. याशिवाय केरळने प्रत्येक वयोगटातील लोकांना हे ज्ञान आणि कौशल्ये मिळतील हे सुनिश्चित केले, मग ते विद्यार्थी असोत, गृहिणी असोत, मनरेगा कामगार असोत, शेतीत गुंतलेले तरुण असोत किंवा वृद्ध; केरळच्या या यशाचे सर्वात मोठे कारण म्हणजे त्याचा उच्च साक्षरता दर आणि शिक्षणव्यवस्थेत तंत्रज्ञानाचा स्वीकार. निःसंशयपणे, राज्य सरकारच्या राजकीय इच्छाशक्तीनेही या मोहिमेला गती देण्यात मोठी भूमिका बजावली आहे. याशिवाय, सामाजिक सहभाग आणि तांत्रिक पायाभूत सुविधांची सहज उपलब्धता यामुळे या मोहिमेला जनआंदोलनाचे स्वरूप मिळाले. स्थानिक संस्था आणि स्वयंसेवी संस्थांनीही या प्रयत्नात उत्साहाने भाग घेतला. आता प्रश्न असा आहे की हे मॉडेल संपूर्ण भारतात कसे राबवता येईल. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात एकच मॉडेल थेट राबवणे शक्य होणार नाही आणि योग्यही होणार नाही.

या पार्श्वभूमीवर सर्वप्रथम प्रत्येक राज्याला त्यांच्या स्थानिक परिस्थितीनुसार हे मॉडेल तयार करावे लागेल. काही राज्यांमध्ये भौगोलिक अडथळे आहेत तर काहींमध्ये सामाजिक-कौटुंबिक परंपरा आहेत. हे सर्व लक्षात घेऊन डिजिटल शिक्षण कार्यक्रम तयार करावे लागतील. ग्रामीण भारतात अजूनही इंटरनेटची सुविधा मर्यादित आहे. त्यामुळे डिजिटल पायाभूत सुविधा आणखी मजबूत करणे आवश्यक आहे. त्यासाठी 'भारतनेट'सारख्या योजना जलद गतीने राबवाव्या लागतील. त्यामुळे प्रत्येक पंचायत स्तरावर ब्रॉडबँड सुविधा सहज उपलब्ध होईल. यासोबतच प्रत्येक जिल्हा आणि ब्लॉकमध्ये स्थानिक डिजिटल प्रशिक्षण केंद्रे स्थापन करावी लागतील. महिला, युवक आणि शेतकऱ्यांमध्ये डिजिटल साक्षरता वाढवण्यासाठी प्राधान्य दिले पाहिजे. विशेषतः महिला स्वयंसहाय्यता गट आणि अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षित करून त्यांच्या समुदायांमध्ये प्रशिक्षण कार्यात सहभागी करून घेता येईल. यामुळे समाजात डिजिटल जागरूकतेचे वातावरण निर्माण होईल आणि तंत्रज्ञानाचा समावेश जलद होईल. या मोहिमेत शैक्षणिक संस्थांचा सक्रिय सहभाग क्रांतिकारी ठरू शकतो. स्थानिक तांत्रिक संस्था वेळोवेळी त्यांच्या विद्यार्थ्यांना जवळच्या ग्रामीण भागात प्रशिक्षणासाठी प्रेरित करू शकतात. यामुळे तरुण विद्यार्थ्यांना त्यांच्या सामाजिक जबाबदारीची जाणीव होईल. खासगी संस्था आणि गैरसरकारी संस्थांच्या सहकार्याने सार्वजनिक-खासगी भागीदारीअंतर्गत ही मोहीम यशस्वी करण्यासाठी सरकारला दररोज नवोपक्रम करण्यासाठी जोरदार प्रयत्न करावे लागतील.

या मोहिमेसाठी तांत्रिक कौशल्ये, ज्ञान, सामग्री आणि संसाधनांच्या स्वरूपात खासगी क्षेत्र महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकते. याशिवाय, डिजिटल साक्षरतेची सामग्री आणि संसाधने स्थानिक भाषांमध्ये उपलब्ध असणे अत्यंत आवश्यक आहे; जेणेकरून सामान्य नागरिक ते सहज समजू आणि वापरू शकतील. या प्रयत्नांमध्ये अंमलबजावणीचे निरीक्षण आणि मूल्यांकन करण्याची एक मजबूत व्यवस्था तयार करणे आवश्यक आहे. कोणत्याही राज्यात ही योजना तुलनेने मंद गतीने सुरू असल्यास वेळेत सुधारणात्मक पावले उचलण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. इतकेच नाही, तर लोकांच्या सामाजिक मानसिकतेत बदल घडवून आणण्याचीही गरज आहे. असे झाल्यास ते तंत्रज्ञान सहजपणे स्वीकारू शकतील. या प्रयत्नात निश्चितच काही आव्हाने असतील. काही राज्यांना संसाधनांचा अभाव जाणवू शकतो तर कुठे तरी तांत्रिक प्रशिक्षकांची उपलब्धता ही समस्या असू शकते. अनेक समुदायांमध्ये, वडीलधारी आणि रूढीवादी विचारसरणीमुळे तंत्रज्ञान स्वीकारण्यात अडचण येऊ शकते; परंतु सरकार, समाज, खासगी आणि इतर भागधारकांनी नियोजनबद्ध प्रयत्न केल्यास हे काम अशक्य नाही. केरळचे डिजिटल साक्षरता मॉडेल देशासाठी एक आदर्श उदाहरण आहे. 'डिजिटल इंडिया'च्या स्वप्नाला मूर्त स्वरूप द्यायचे असल्यास इतर राज्यांना केरळकडून शिकावे लागेल, स्थानिक गरजांनुसार योजना आखाव्या लागतील आणि समाजातील प्रत्येक घटकाच्या सहभागाने देशभर डिजिटल साक्षरतेच्या चळवळीचा प्रसार करावा लागेल. तरच भारत एक मजबूत आणि समावेशक डिजिटल राष्ट्र म्हणून पुढे जाऊ शकेल.

केरळने हे कसे साध्य केले, हा ही अभ्यासाचा विषय आहे. हे एकाएकी झाले नाही. राज्य साक्षरता अभियान प्राधिकरणाने अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीतील महिलांवर विशेष भर देऊन विद्यार्थ्यांच्या साक्षरतेचे प्रमाण वाढवण्यासाठी अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. आठ जिल्ह्यांमध्ये सुरुवातीच्या टप्प्यात सुरू करण्यात आलेला हा व्यापक डिजिटल साक्षरता उपक्रम या उपेक्षित समुदायांना भेडसावणाऱ्या शैक्षणिक आणि सामाजिक-सांस्कृतिक असमानता दूर करण्यासाठी समर्पित आहे. राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था आणि राज्य मुक्त आणि जीवनभर शिक्षण परिषद यासारख्या संस्थांचा सक्रिय सहभाग या प्रकल्पांमध्ये स्वीकारल्या जाणाऱ्या व्यापक दृष्टिकोनाचे महत्त्व अधोरेखित करतो. पूर्ण डिजिटल साक्षरता साध्य करण्याच्या दिशेने केरळची प्रगती केवळ शिक्षणाप्रती असलेले त्यांचे समर्पण दर्शवत नाही, तर डिजिटल युगात व्यक्तींना सक्षम बनवण्यात तंत्रज्ञानाची महत्त्वाची भूमिकादेखील अधोरेखित करते. विधानसभेचे सदस्य केरळच्या यशोगाथेपासून प्रेरणा घेऊन आपल्या राज्यात डिजिटल साक्षरता वाढवणारी धोरणे आणि कार्यक्रम तयार करून अंमलात आणू शकतात. त्यामुळे डिजिटल सक्षमीकरणाच्या व्यापक राष्ट्रीय ध्येयात योगदान मिळेल. पूर्ण डिजिटल साक्षरता साध्य करण्याच्या केरळच्या वचनबद्धतेचा केवळ भारतातील मंत्री आणि आमदारांवरच नव्हे, तर संपूर्ण देशावर मोठा प्रभाव पडतो.

केंद्र सरकार विविध राज्यांच्या विविध गरजा लक्षात घेऊन मोठ्या प्रमाणात डिजिटल असमानता दूर करणारे उपक्रम आखण्यासाठी केरळच्या मॉडेलपासून प्रेरणा घेऊ शकते. डिजिटल साक्षरता ही आर्थिक संधींशी आंतरिकरित्या जोडली आहे. डिजिटल कौशल्ये वाढवून व्यक्ती ई-कॉमर्स, ऑनलाइन फ्रीलान्सिंग आणि रिमोट वर्कसह डिजिटल अर्थव्यवस्थेत सहभागी होण्यासाठी अधिक सुसज्ज असतात. केरळच्या उपक्रमांची प्रतिकृती बनवून राज्यातील नेते अशा आर्थिक सक्षमीकरणाला प्रोत्साहन देऊ शकतात. डिजिटल साक्षरतेवर अधिक लक्ष केंद्रित केल्याने भारतातील शैक्षणिक क्षेत्राला लक्षणीय फायदा होईल.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## संघर्षाची वेळ येवूच नये : पवार

घेऊ, अशा शब्दांत शिक्षकांना आश्वासित केले. यावेळी आंदोलन करणाऱ्या शिक्षकांशी संवाद साधताना शरद पवार म्हणाले की, गेल्या काही दिवसांपासून न्याय मागण्यांसाठी संघर्ष करण्याची वेळ तुमच्यावर आली आहे. शासकीय कर्मचारी, निमशासकीय कर्मचारी हे महाराष्ट्रातील प्रशासनातील महत्त्वाचे घटक आहेत. त्यांना सन्मान देण्याची भूमिका महाराष्ट्र शासनाने घेतली पाहिजे. काल मला रोहित पवारांकडून समजले की येथे एक राज्यातील मंत्री येत आहेत. मला वाटलं की हे मंत्री येत आहेत तर चर्चा करून प्रश्न सोडवतील. पण अजूनही हा प्रश्न सुटलेला नाही. राज्य सरकारला स्पष्टपणे सांगायची गरज आहे की, ज्ञानदानाची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, ज्यांनी उद्याची पिढी घडवण्याची नैतिक जबाबदारी अंतकरणापासून स्वीकारली आहे, त्यांच्यावर संघर्षाची वेळ येता कामा नये. शिक्षकांची जी मागणी आहे त्यासाठी लवकरात लवकर पैशाची तरतूद करा. तुमच्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी आमच्या सगळ्यांकडून आग्रही भूमिका घेतली जाईल, असे त्यांनी म्हटले. तसेच आज निर्णय झाल्यानंतर जीआर काढायला अर्थखात्याकडे जावं लागतं, सामान्य प्रशासन खात्याकडे जावं लागतं. तुम्ही काही चिंता करू नका, प्रशासनातील मला थोडंफार समजतं. महाराष्ट्राची विधानसभा, विधानपरिषद आणि देशाची लोकसभा, राज्यसभा यात मी गेली ५६ वर्षे सतत कार्यरत आहे. त्यामुळे प्रशासनाबाबत तुम्ही काही चिंता करू नका. कसा निर्णय घ्यायचा असतो, कशी तरतूद आणायची असते आणि कशी ती तुमच्यापर्यंत पोहोचवायची असते, हे मला कोणी सांगायची गरज नाही. त्यामुळे ती चिंता करू नका, असेही शरद पवार यांनी म्हटले.

## गुजरातमधील महिसागर नदीवरील पूल कोसळला

दाखल झाले असून, बचावकार्य सुरू आहे. अडकलेल्या प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तसेच, नदीत पडलेल्या वाहनांमधील व्यक्तींची सुटका करण्यासाठी विशेष काळजी घेतली जात आहे. या घटनेने स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जुन्या पायाभूत सुविधांच्या देखभालीकडे प्रशासनाचे लक्ष वेधले जाण्याची गरज आहे. पूल कोसळण्याच्या कारणांचा तपास सुरू असून, याबाबत अधिक माहिती लवकरच समोर येण्याची शक्यता आहे. प्रशासनाने नागरिकांना या मार्गाचा वापर टाळण्याचे आणि पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.

## सीएमनी गायकवाडांचे कान टोचले

तक्रार करता येते. त्याच्यावर कारवाई करता येते. तो वेगळा मुद्दा आहे. अध्यक्ष महोद्य, आमदार निवासामध्ये काहीही अनियमितता असेल, तर आपण स्वतः लक्ष घालावं, असे त्यांनी म्हटले. तसेच अशा परिस्थितीत लोकप्रतिनिधीने मारहाण करणे आणि त्याचे व्हिडीओ येणे. टॉवेलवर येऊन मारलं किंवा कसेही मारले तरी ते चुकीचेच आहे. योग्य नाही, यातून सगळ्या आमदारांबद्दल लोकांमध्ये चुकीची भावना जाते. आपण सत्तेचा गैरवापर करतो किंवा आमदार म्हणून आपलं वर्तन योग्य नाही, असे लोकांना वाटेल. ही गंभीर बाब आहे. अध्यक्षांनी याची दखल घ्यावी आणि यासंदर्भात काय कारवाई () करायची, ती करावी'', अशी विनंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषद अध्यक्ष आणि विधानसभा अध्यक्षांना केली. ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी म्हटले होते की, सरकारचा आपल्याच आमदारांवर वचक आहे की नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे. सुसंस्कृत महाराष्ट्राच्या प्रतिमेला तडा देण्याचे काम सुरू आहे. एक आमदार बनियन आणि टॉवेलवर येतो आणि बॉक्सिंग करत असल्यागत एका साध्या माणसाला मारतो. अरे हिंमत असेल तर त्या खात्याच्या मंत्र्याला मारा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिमा क्लीन आहे आणि तुम्ही अशा आमदाराचा पाठिंबा घेणार का? असा सवाल त्यांनी केला. आपल्या विधिमंडळ कक्षात सदर विभाग येतो, त्यामुळे तुम्ही त्यांना निलंबित करा, अशी मागणी देखील परब यांनी केली. कॅन्टीन मालकाची मुजोरी इतकी वाढली आहे, की अनेकांच्या ताटात पाल, उंदिर, झुरळं निघतात. कालच्या घटनेनंतर अनेकांचे फोन आले आणि त्यांनी आमच्यासोबतही असं घडल्याचे सांगितले. या निकृष्ट जेवणाबद्दल माझी त्या कँटिनमध्ये अशाप्रकारे रिॲक्शन होती. मी केलेल्या गोष्टीचा मला पश्चाताप नाही, मी विधानभवनात अध्यक्षांनी परवानगी दिली तर हा मुद्दा मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. आमदार असलो तरी मी माणूस आहे, कोणी माझ्या जीवाशी खेळत असेल, तर मला माझ्या जीवनरक्षणाचा अधिकार आहे', असे आमदार संजय गायकवाड यांनी म्हटले.

## 'कर्जमुक्तीसाठी सद्बुद्धी दे' : ॲड. काळे

आषाढी एकादशीचे पुर्वसंधेला झालेल्या घंटानाद आंदोलन प्रसंगी ॲड. अजित काळे बोलत होते. यावेळी शेतकरी नेत्या प्रतिभा घोगरे, शेतकरी संघटना जिल्हाध्यक्ष अनिल औताडे, श्रीरामपूर जिल्हा संघर्ष समिती अध्यक्ष राजेंद्र लांडगे, तालुकाध्यक्ष युवराज जगताप, युवाध्यक्ष शरद आसने, माजी उपसरपंच राजेंद्र कोकणे, शिवसेना जिल्हा संघटक दादासाहेब कोकणे, अशोक कारखाना माजी संचालक भाऊसाहेब पटारे, सेवा संस्था माजी चेअरमन एकनाथ पटारे, श्री विठ्ठल-रुख्मिणी देवस्थान सचिव नानासाहेब लेलकर, पुरोहित राजेंद्र देवळालकर, माजी डॉ. दादासाहेब आदिक, अर्जुन राऊत, संतोष पटारे, सुजित बोडखे, गायक देविदास दाभाडे, ईश्वर दरंदले, अमोल मोढे, सुरेश काळे, अशोक काळे, शिवाजी पटारे, अनिल बोडखे, अक्षय कोकणे, रामेश्वर शिंदे, रमेश कोकणे, जितेंद्र पटारे, नानासाहेब थोपटे, शिवाजी पटारे, अनिल मगर, राजेंद्र नवले, रोहिदास पटारे, भाऊसाहेब गव्हाणे आदी शेतकरी उपस्थित होते. याप्रसंगी ॲड. काळे म्हणाले, १९ फेब्रुवारीपासून शेतकरी कर्जमुक्ती अभियानाला सुरुवात केली. आजरोजी शेती बरोबर दुग्ध व्यवसायाची देखील वात लागली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बँका आणि वित्तीय संस्थांनी शेतकऱ्यांना कर्ज वितरित करतांना सिबिल विचारात घेऊ नये. तसेच शेतकऱ्यांना पीक कर्ज वितरित करावे अशा सूचना केल्या आहे. बँका व वित्तीय संस्थाने शेतकऱ्यांची अडवणूक थांबवून त्रास देऊ नये. तसेच सिबिल स्कोर कमी असलेल्या शेतकऱ्यांना कर्ज वितरित करावे. व थकलेले खाते होल्ड करायचे थांबवावे. जेणे करून शेतकरी सन्मान निधीची येणारी रक्कम मिळण्यापासून कोणत्याही शेतकऱ्यांना रोखू नये, असा इशारा अजित काळे यांनी दिला.

## बारस्करांमुळे रस्त्याचा प्रश्न निकाली

माध्यमातून मार्गी लागला असल्यामुळे या परिसराला सुशोभीकरणाचे रूप प्राप्त झाले आहे. तपोवन रोडला पर्याय रस्ता म्हणून राजनंदिनी हॉटेल ते तलाठी कार्यालय ते मनमाड महामार्गाला जोडणाऱ्या डीपी रस्त्याचे काम सुरू आहे. सुशोभीकरण कामातून भिस्तबाग पडक्या महालाची ओळख आता पुसणार असून पर्यटनाचे केंद्र बनणार आहे. विकास कामातून प्रभाग १ चा राज्यात विकसित प्रभाग म्हणून ओळख निर्माण करणार असल्याचे प्रतिपादन माजी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे यांनी केले. मनपा माविरोधी पक्ष नेते संपत बारस्कर यांच्या प्रयत्नातून शुक्लेश्वर मंदिर परिसरातील रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला. यावेळी माजी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, सचिन कुसळकर, विकास बडे, अर्जुन ससे, परेश खराडे, गिरीश गायकवाड, अशोक शिंदे, विष्णू सब्बन, आदिनाथ म्हस्के, सुभाष शेकडे, वैभव आवारी, सुभाष आढाव, विजय बर्डे, दत्तात्रय झगडे, दिलीप हिवाळे, नितीन धुमाळ, उद्धव ढोबे, महेश बोरकर, सचिन गोरे, सोनाली आढाव, वंदना कुसळकर, सुनीता शेकडे, प्रतिभा बडे, श्रद्धा सब्बन, ज्योती शिंदे, क्रांती मुंणदाकर, जयश्री ससे, पल्लवी खराडे, अर्चना झगडे, स्वप्नाली धुमाळ, मनीषा गांगर्डे, निकिता गायकवाड, सौ. आरोळे, जयश्री गिरवलकर, निशा जगताप, राजश्री झावरे, सविता कदम, पूनम आवारे, अरुणा पारधे, वृषाली सैंदाने, सपना डोळस, तेजस्विनी आंधळे आदी उपस्थित होते.

## तुकडेबंदी कायदा शिथिल

कायदेशीर प्रक्रियांना अडथळे निर्माण झाले आहेत. असा प्रश्न खताळ यांनी उपस्थित केला होता. तर आमदार जयंत पाटील, विजय वड्डेटीवार, विक्रम पाचपुते, प्रकाश सोळंके, अभिजीत पाटील यांनी याबाबत सभागृहात प्रश्न उपस्थित केले. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, ज्या ज्या ठिकाणी नागरिक क्षेत्र निर्माण झाले आहे, त्या ठिकाणी आपण तुकडेबंदी कायदा एक गुंठा परंत निरस्त करत आहे. ज्या लोकांनी २० गुंठ्यामध्ये १० लोक प्लॉटिंग केले आहे, त्यांची पहिली रजिस्ट्री झाली आहे त्यांची पुन्हा रजिस्ट्री करण्याची मागणी आहे. हा कायदा झाला आणि एसओपी झाली की लगेच री रजिस्ट्री सुरू होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जो विकसित महाराष्ट्राचा संकल्प केला आहे. त्या संकल्पानूसार सर्व काम सर्व विचार एसओपीमध्ये करण्यात येईल, असे महसूलमंत्री यांनी म्हटले आहे. महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले की, तुकडेबंदी कायदा शिथिल करताना एक योग्य कार्यपद्धती तयार करून १५ दिवसांत ती जाहीर केली जाईल. ही एसओपी प्लॉटिंग, लेआऊट, रस्ते, रजिस्ट्री, रिअलिस्टिक बांधकामे यासंबंधी नियम स्पष्ट करेल. ही प्रक्रिया दलालांचा हस्तक्षेप रोखण्यासाठी पारदर्शक पद्धतीने राबवली जाईल. एसओपी तयार करण्यासाठी चार सदस्यीय समिती गठित करण्यात येईल. यामध्ये एसीएस महसूल, एसीएस युडी, जमाबंदी आयुक्त आणि आयजीआर यांचा समावेश असेल. ही समिती प्रत्येक भागातील परिस्थितीचा अभ्यास करून शिफारसी करेल. नगरपरिषद व महानगरपालिकांना लागून असलेल्या ग्रामीण भागांचा या निर्णयात समावेश व्हावा, अशी सूचना आमदारांनी केली. तसेच राष्ट्रीय व राज्य महामार्गालगत विकसित झालेल्या वस्त्यांना याचा लाभ मिळावा, यासाठीही मागणी करण्यात आली. मागील सरकारने १२ जुलै २०२१ रोजी काढलेल्या परिपत्रकानुसार, शेतजमिनीचे व्यवहार करताना जिरायतसाठी किमान २० गुंठे आणि बागायतीसाठी १० गुंठे इतके प्रमाणभूत क्षेत्र बंधनकारक ठरवले होते. यामुळे १-२-३ गुंठ्यांमध्ये जमिनी विकत घेणाऱ्या हजारो शेतकऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागत होते. आता या तुकडेबंदी कायद्याच्या रद्दबातल निर्णयामुळे शेतजमिनींच्या खरेदी-विक्री व्यवहाराला नवीन दिशा मिळणार असून, अनेक छोटे शेतकरी आणि नागरिक यांना मोठा दिलासा मिळणार आहे. महाविकास आघाडीकडूनही या निर्णयाचे स्वागत करण्यात आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील, काँग्रेसचे विजय वड्डेटीवार, भाजप आमदार विक्रम पाचपुते, राष्ट्रवादीचे प्रकाश सोळंके, अभिजित पाटील यांनी या निर्णयाचे स्वागत करत धाडसी निर्णय घेतल्याबद्दल अभिनंदन केले.

## ...तर महाविकास आघाडी फुटणार?

विशेषतः मुंबई महापालिकेची निवडणूक एकत्र लढतील असा दावा केला जात आहे. या पार्श्वभूमीवर पृथ्वीराज चव्हाण यांनी उपरोक्त विधान केले आहे. ते बुधवारी पत्रकारांशी बोलताना म्हणाले, राजकीयदृष्ट्या वेगळे झालेले दोन भाऊ पुन्हा एकत्र येत असतील तर त्यांचे स्वागतच आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ते एकत्र लढणार असतील तर ही सुद्धा चांगली बाब आहे. एक पक्ष कमी होईल. पण त्यांचा हा निर्णय केवळ एका निवडणुकीपुरता असेल तर पुढे काय होईल हे माहिती नाही. भविष्यात दोन्ही पक्ष एकमेकांत विलीन होतील का? हा प्रश्न आहे. ठाकरे बंधूंचे पक्ष एकमेकांत विलीन झाले, तर त्याचे नेतृत्व कोण करणार? याविषयी जनतेला उत्सुकता आहे. विजयी मेळावा घेणे, त्यासाठी एकत्र येणे चुकीचे नाही. पण कोणत्याही पद्धतीच्या मारहाणीला आमचे समर्थन नाही. ही अत्यंत चुकीची गोष्ट आहे. महाराष्ट्राची एक परंपरा आहे. ती भंग होईल अशा कोणत्याही गोष्टीला आमचा पाठिंबा नसेल. काँग्रेस पक्षाने यापूर्वी अनेकदा स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक स्वबळावर लढवली आहे. त्यामुळे पक्षाने मुंबई, पुणे व नागपूर महापालिकेची निवडणूक स्वतंत्रपणे लढवण्याचा निर्णय घेतला तर मला आश्चर्य वाटणार नाही, असेही पृथ्वीराज चव्हाण यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले. दरम्यान, काँग्रेससह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने लोकसभा व विधानसभेची निवडणूक एकत्र लढली होती. पण आता ठाकरे गटाने मनसेशी सूर जुळवण्याचे संकेत दिल्यामुळे महाविकास आघाडीचे भवितव्य अधांतरी असल्याचा दावा केला जात आहे.

# हरेगावात वेलनेस हेल्थ कॅम्प संपन्न



**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिरसगाव** : हरेगाव येथील संत तेरेजा चर्च येथे वेलनेस हेल्थ कॅम्प मोठ्या उत्साहात पार पडला.

आहाराकडून आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. चुकीच्या जीवनशैलीमुळे वाढणारे वजन व त्याद्वारे वाढणारे आजार, यावर योग्य आहार, वर्क आऊट आणि शरीरासाठी लागणारे न्यूट्रेशन हे आपल्या जीवनात किती महत्वाचे आहे, हे वेलनेस डॉ. प्रशांत विटनोर व डॉ. नीलम विटनोर यांनी समजावून सांगितले. यावेळी भाविकाचे हेल्थ चेकअप करण्यात आले व त्यावर अतिशय मोलाचं मार्गदर्शन विटनोर व त्यांच्या टीमने केले. बऱ्याच भाविकांनी त्याचा लाभ घेतला.

याप्रसंगी संत तेरेजा चर्च, प्रमुख धर्मगुरू डॉमनिक यांनी सर्वांचे आभार मानले. या प्रसंगी फा. डॉमनिक रोझा, फ्रँसिस ओहोळ, सुभाष व्हसाळे, निरज बनसोडे, सुनील साळवे, संजय बनसोडे, दिवे सी. एम., वाय. जी. त्रिभुवन, अंतोन क्षीरसागर राजेंद्र मगर आदी उपस्थित होते. हा कॅम्प यशस्वी होण्यासाठी सुप्रिया सोनवणे, किर्ती बनसोडे, सविता आघाडे यांनी परिश्रम घेतले.

# शिर्डीत गुरूपौर्णिमा उत्सवास सुरूवात

## आज मंदिर रात्रभर उघडे राहणार; भाविकांनी साईनगरी दुमदुमली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी** : श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने आयोजित केलेल्या श्री गुरुपौर्णिमा उत्सवास आज उत्साही वातावरणात सुरुवात झाली. श्री साईबाबा समाधी मंदिर व परिसरात करण्यात आलेल्या विद्युत रोषणाई व फुलांच्या सजावटीने भाविकांचे लक्ष वेधून घेतले.

काल उत्सवाच्या प्रथम दिवशी पहाटे ०५.१५ वाजता श्रींची काकड आरती झाल्यानंतर श्रींची प्रतिमा, पोथी व विणाची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी पोथी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भिम राज दराडे यांनी विणा घेऊन तर साईआश्रम भक्तनिवास प्र. अधिक्षक विजय वाणी व प्र. उप वैद्यकिय संचालक डॉ. प्रितम वडगावे यांनी प्रतिमा घेवून सहभाग घेतला. यावेळी संस्थानचे प्रशासकीय अधिकारी संदीपकुमार भोसले, मंदिर प्रमुख विष्णु थोरात, प्र. जनसंपर्क अधिकारी दिपक लोखंडे, मंदिर पुजारी, शिर्डी ग्रामस्थ व साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



मिरवणूक व्दारकामाई मंदिरात आल्यानंतर तेथे श्री साईसच्चरित या पवित्र ग्रंथाच्या पारायणाचा शुभारंभ मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी प्रथम अध्याय, साईआश्रम भक्तनिवास प्र. अधिक्षक विजय वाणी यांनी व्दितीय अध्याय, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भिमराज दराडे यांनी तृतीय अध्याय, प्रशासकिय अधिकारी संदीपकुमार भोसले यांनी चौथा अध्याय व प्र. प्रशासकिय अधिकारी विश्वनाथ बजाज यांनी पाचवा अध्याय वाचन करुन केला. उत्सवाचे निमित्ताने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर व त्यांच्या सुविद्य पत्नी वंदना गाडीलकर यांनी श्रींची पाद्यपूजा केली. रात्रौ श्रींच्या पालखीची गावातून मिरवणूक काढण्यात आली.

यावर्षी उत्सवाच्या निमित्ताने साईराज डेकोरेटर्स, मुंबई यांनी मंदिर व परिसरात केलेल्या आकर्षक विद्युत रोषणाईने साईभक्तांचे लक्ष वेधुन घेतले.

### आज मंदिरात होणारे कार्यक्रम

उत्सवाच्या आज मुख्य दिवशी पहाटे श्रींची काकड आरती, अखंड पारायण समाप्ती व श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक, दुपारी श्रींची माध्यान्ह आरती होईल. सायंकाळी वेदश्री ओक, बोरीवली यांचा कीर्तन कार्यक्रम होणार असून, सायंकाळी ७ वाजता श्रींची धुपारती होईल. रात्रौ ०७.३० ते १० यावेळेत श्रीमती अनुराधा पौडवाल, मुंबई यांचा साई संध्याचा कार्यक्रम, रात्रौ ०९.१५ वाजता श्रींच्या रथाची गावातून मिरवणूक निघणार आहे. उद्या गुरुवार असल्याने नित्याची चावडी पुजन होईल. हा उत्सवाचा मुख्य दिवस असल्याने समाधी मंदिर रात्रभर दर्शनासाठी उघडे राहणार आहे.

# १ जानेवारी २०२५ पर्यंतचे तुकडाबंदी व्यवहार नियमित होणार

## ना. बावनकुळे; आ. अमोल खताळ यांची लक्षवेधी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : विधान सभेच्या पावसाळी अधिवेशनात आ. अमोल खताळ यांनी नगर पालिका हद्दीत व हद्दी लगत नागरी वस्तीत लागू असलेला तुकडाबंदी कायदा रद्द करण्याच्या मागणीला राज्याचे महसूलमंत्री चंद्रकात बावनकुळे यांनी सकारात्मक प्रतिसाद देवून १ जानेवारी २०२५ पर्यत झालेले सर्व व्यवहार नियमित करण्याचे आश्वासन दिल्याने राज्यातील लाखो कुटुंबियांना दिलासा मिळणार आहे.

राज्यात तुकडाबंदी कायद्यानूसार एक किंवा दोन गुंठ्यांचे व्यवहार केलेल्या नागरीकांना तुकडाबंदी कायद्याच्या बंधनामुळे घेतलेल्या जागेवर कोणतेही बांधकाम किंवा त्या जागांचे व्यवहार सुध्दा करता येत नव्हते. या संदर्भात आ. अमोल खताळ यांनी लक्षवेधीद्वारे शासनाचे लक्ष वेधत तुकाडाबंदी कायद्याची अट रद्द करावी, या महत्वपूर्ण मागणीवर उत्तर देताना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील महानगरपालिका नगरपरिषद आणि नगरपंचायत क्षेत्राच्या हद्दीत व हद्दी लगत ज्या भागात तुकाडाबंदी कायद्याचे उल्लंघन झाले असेल त्या भागामध्ये १ जानेवारी २०२५ पर्यत झालेल्या व्यवहाराकरीता नियम शिथिल करण्याचे जाहीर केले. तसेच तुकडाबंदी कायद्याच्या संदर्भात राज्याचे महसूल विभागाचे अप्पर मुख्य सचिव मुद्रांक आयुक्त आणि जमाबंदी आयुक्त आणि नगरविकास सचिव यांची समिती नेमून येत्या पंधरा दिवसात तुकडा बंदी बाबत निश्चित मार्गदर्शक प्रणाली तयार करण्याची घोषणा महसूलमंत्री बावनकुळे यांनी केली.यासंदर्भात आ.अमोल खताळ यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच जलसंपदा तथा अहील्यानगर जिल्ह्याचे पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे या प्रश्नाबाबत सातत्याने पाठ पुरावा सुरू ठेवला होता. सरकारने घेतले ल्या निर्णयाबद्दल आभार व्यक्त करून या निर्णयामुळे सर्वसामान्य माणसाला महा युती सरकारने दिलासा दिला असल्याची प्रतिक्रीया आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केली.




# पाटबंधारे विभागाने आपले कर्तव्य बजवावे

## आ.काळे; जायकवाडी धरण ६५ टक्के

**जनता आवाज वृत्तसेवा**



**कोळपेवाडी** : गोदावरी कालव्याच्या लाभक्षेत्रावर समन्यायी पाणीवाटप कायद्यामुळे दरवर्षी असलेली टांगती तलवार यावर्षी वरुणराजाच्या कृपेमुळे दूरू झाली आहे. २०२० नंतर पुन्हा एकदा जायकवाडी धरण जुलै महिन्यातच ६५ टक्के भरले आहे. त्यामुळे अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यातील गोदावरी कालव्याच्या लाभधारक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. परंतु आता पाटबंधारे विभागाची जबाबदारी वाढली असून पावसाळ्यात ओव्हर फ्लोच्या पाण्यातून गोदावरी कालवे जास्तीत जास्त दिवस कसे प्रवाहित राहतील, यासाठी प्रामाणिक प्रयत्न करून आपले कर्तव्य चोखपणे पार पाडावे असे आ.आशुतोष काळे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

सध्या मुंबई येथे विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू असून आ. आशुतोष काळे या अधिवेशनासाठी उपस्थित असले तरी मे व जून महिन्यापासून आजतागायत धरण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पडत असलेला पाऊस त्यामुळे नांदूर मध्यमेश्वर बंधाऱ्यातून गोदावरी नदीतून जायकवाडी धरणात जमा होणाऱ्या पाणी साठ्याच्या आकडेवारीवर त्यांचे बारीक लक्ष होते. धरण क्षेत्रात पर्जन्यवृष्टी तर गोदावरी कालव्याच्या लाभक्षेत्रात पावसाने उघडीप दिल्यामुळे गोदावरी कालव्यांना ओव्हरफ्लोचे पाणी सोडावे, याबाबत राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा. यांना त्यांनी पत्र देखील दिले आहे. अन्यायकारक समन्यायी पाणीवाटप कायद्यानुसार जायकवाडी धरणाचा पाणी साठा ६५ टक्के झाला आहे. त्यामुळे गोदावरी कालव्याच्या लाभधारक क्षेत्रातील शेती आणि शेतकऱ्यांचे भवितव्य अवलंबून असणाऱ्या नासिकच्या धरणातून जायकवाडीला जाणारे पाणी कमी करून हे पाणी पूर्ण क्षमतेने गोदावरी कालव्यांना सोडण्यासाठी कोणत्याही प्रकारची अडचण नाही.मागील पाच वर्षानंतर पुन्हा एकदा जुलै महिन्यातच जायकवाडी धरण ६५ टक्के भरल्यामुळे यावर्षी समन्यायीची टांगती तलवार दूर झाली हि शेतकऱ्यांसाठी अतिशय आनंदाची बाब आहे. मागीलवर्षी प्रमाणे याही वर्षी गोदावरी कालव्यांना जास्तीत जास्त आवर्तन कसे देता येईल यासाठी पाटबंधारे विभागाने योग्य नियोजन करणे गरजेचे आहे.

# देवगावमध्ये मावा मशिन जप्त

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : तालुक्यातील देवगाव याठिकाणी १० हजार किंमतीची मावा बनवणारी मशीन नेवासा पोलीसांनी जप्त केल्याने तालुक्यात चांगलीच खळबळ उडाली आहे.

याबाबतची माहिती अशी की, पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांना तालुक्यातील देवगाव येथील अशोक दगडू जामदार हे त्याचे राहते घराच्या शेजारच्या पत्र्याच्या शेडच्या आडोशाला शरीरास अपायकारक असलेले व शासनाची बंदी घातलेले सुगंधित मावा तयार करीत असल्याची माहिती मिळाली.पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक मनोज अहिरे, हरिभाऊ धायतडक, दिलीप घोळवे, म्हैसमाळे यांच्या पथकाने अशोक जामदार याचे रहाते घरी छापा घातला. या छाप्यात मावा बनवण्याचे अंदाजे १० हजार रुपये किंमतीचे मशीन मिळून आले. याबाबत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येवून मावा बनवणारा इसम अशोक जामदार यांस अटक करण्यात आली आहे.

शरीरास अपायकारक असलेले व शासनाची बंदी घातलेले सुगंधित मावा व मावा तयार करण्याचे मशीन तसेच गुटखा आढळून आल्यास कडक कारवाई करण्याचा इशारा पो. नि. धनंजय जाधव यांनी दिला

# पाथर्डीत मध्यरात्री घरफोडी आणि हल्ला!

## तिघा दरोडेखोरांनी शेतकऱ्याला मारहाण करून ऐवज लुटला

**जनता आवाज वृत्तसेवा**



**पाथर्डी** : पाथर्डी तालुक्यातील मालेवाडी गावात दि. ८ जुलैच्या मध्यरात्री घडलेल्या थरारक घरफोडीच्या घटनेने खळबळ उडाली आहे. तोंडाला कपडा बांधलेल्या तिघा अज्ञात दरोडेखोरांनी घरात शिरून शेतकरी रामहरी दराडे (वय ३९) यांना मारहाण केली आणि घरातील सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरून नेली. या प्रकरणी पाथर्डी पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल करण्यात आली आहे.रामहरी दराडे हे शेती आणि फिटरचे काम करून उदरनिर्वाह करतात. सध्या ते पत्नी मंगल यांच्यासोबत मालेवाडीत राहतात. त्यांची मुले शिक्षणासाठी गावाबाहेर आहेत. फिर्यादीनुसार, दि. ७ जुलै रोजी रात्री १० वाजता दराडे दाम्पत्य झोपले होते. मात्र मध्यरात्रीच्या सुमारास पत्नी मंगल हिच्या आरडाओरडाने दराडे जागे झाले. त्यांनी पाहिले की, तोंडाला कपडा बांधलेले तीन अनोळखी इसम हातात लाकडी काठी व लोखंडी शस्त्रे घेऊन घरात घुसले होते. त्यापैकी एकाने दराडे यांच्या पायावर काठीने मारहाण केली, तर दुसऱ्याने कपाळावर घाव घातला.

कपाटातून ६ ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या पळ्या व मणी, मुलांचे चांदीचे ५ भाराचे ब्रेसलेट आणि १९ हजारांची रोख रक्कम चोरीला गेल्याचे आढळले.

### चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद

घटनास्थळाजवळील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात तोंड झाकलेले आरोपी आढळून आले असून, त्यांच्या हातात धारदार शस्त्रे दिसून आली आहेत. आरोपी रात्री १.३० वाजण्याच्या सुमारास स्पष्टपणे कैद झाले आहेत. घटनास्थळी एक लांब कोयता आढळून आला असून, ही घटना पूर्वनियोजित असल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे.

# इमारत बांधकाम संघटनेच्यावतीने आंदोलनास पाठिंबा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : कोपरगाव शहरातील तालुका इमारत बांधकाम कामगार संघटनेच्या वतीने महाराष्ट्र बांधकाम कामगार संघटना संयुक्त कृती समितीचे निमंत्रण कॉ. शंकर पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या राज्यव्यापी आंदोलनास कोपरगाव तालुका इमारत बांधकाम कामगार संघटनेच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे.



याबाबतचे निवेदन कोपरगावच्या नायब तहसीलदार प्रफुल्लिता सातपुते यांना सरकारचे प्रतिनिधी म्हणून देण्यात आले. सदर निवेदनात म्हटले आहे की, शासनाने जाहीर केल्यानुसार प्रत्येक बांधकाम कामगारास ५ हजार रुपये सानुग्रह अनुदान द्या, या मागण्यांसाठी ९ जुलै २०२५ पासून बांधकाम कामगारांचे आझाद मैदान मुंबई या ठिकाणी राज्यव्यापी आंदोलन सुरू आहे.

या आंदोलनास कोपरगाव तालुका इमारत बांधकाम संघटनेचा जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे. सदर निवेदनावर कोपरगाव तालुका इमारत बांधकाम कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष ज्ञानेश्वर अण्णा रोकडे, अध्यक्ष किसन नथू भाबड, उपाध्यक्ष सादिक दादामियाँ पठाण, सचिव सुधाकर बन्सी क्षीरसागरल, चंद्रकांत बागुल, संतोष राठोड यांच्यासह कोपरगाव तालुक्यातील इतर बांधकाम कामगार संघटित पदाधिकाऱ्यांनी राज्यव्यापी अधिवेशनास जाहीर पाठिंबा दिला आहे.

# महानगरपालिकेत अभियंते, विद्युत पर्यवेक्षकांची होणार भरती

## टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसकडे महानगरपालिकेकडून प्रस्ताव सादर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : महानगरपालिकेतील तांत्रिक पदांच्या भरतीचा प्रस्ताव टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसकडे पाठवण्यात आला आहे. महानगरपालिकेचा वाढत असलेला आस्थापना खर्च लक्षात घेऊन तांत्रिक दृष्ट्या आवश्यक असणारी अभियंते विद्युत पर्यवेक्षक अशी ४५ पदेच भरण्यात येणार आहेत.

बिंदू नामवलीसह समांतर आरक्षण निश्चित करून पद भरती प्रक्रिया सुरू करण्यासाठी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसकडे प्रस्ताव पाठवला असून त्यांच्याशी करारनामाही केला आहे. कामकाजात येणारे तांत्रिक अडथळे दूर करण्यासाठी लवकरच ही भरती प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.




महानगरपालिकेचा कर्मचारी आकृतीबंध मंजूर झाल्यापासून आस्थापना खर्च मर्यादेपेक्षा अधिक असल्याने रिक्त पदे भरता आलेली नाहीत. त्यामुळे विविध अभियंते, विद्युत पर्यवेक्षक अशा तांत्रिक कर्मचाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होऊन कामकाजात अडथळे निर्माण झाले आहेत. त्यामुळे महानगरपालिकेने तांत्रिक पदांच्या भरतीसाठी आस्थापना खर्चाची अट शिथिल करून परवानगी द्यावी, असा प्रस्ताव नगर विकास खात्याकडे पाठवला होता. त्याला तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंजुरी देत १७६ पदे भरण्याचा प्रस्ताव मंजूर केला.

दरम्यानच्या काळात सातवा वेतन आयोग लागू झाल्यामुळे महानगरपालिकेच्या आस्थापना खर्चात पुन्हा एकदा वाढ झाली. त्यामुळे कामकाजातील अडथळा दूर करण्यासाठी अत्यावश्यक असलेली ४५ तांत्रिक पदे भरण्याचा निर्णय घेतला आहे.

### या पदांसाठी होणार भरती

कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) - १५, कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) - ३, कनिष्ठ अभियंता (ऑटोमोबाईल) - १, अभियांत्रिकी सहाय्यक - ८, विद्युत पर्यवेक्षक - ३, लिपीक टंकलेखक - १३, संगणक प्रोग्रॅमर - १, पशुधन पर्यवेक्षक - १ अशी ४५ पदे भरण्यात येणार आहे. लवकरच या पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू होणार असल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले.

# पूर्वीच्या पुराव्यावर जात प्रमाणपत्रे निर्गमित करावीत



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : विमुक्त जाती अ प्रवर्गातील जात प्रमाणपत्रांची बोगस घुसखोरी रोखण्यासाठी २१ नोव्हेंबर १९६१ पूर्वीच्या पुराव्याच्या आधारेच जात प्रमाणपत्रे निर्गमित करावीत, तसेच दर महिन्याला दिलेल्या जात प्रमाणपत्रांची यादी जाहीर करावी, अशी मागणी पाथर्डी तालुका गोर सेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

या मागणीचे निवेदन पाथर्डी-शेवगाव उपविभागाचे प्रांताधिकारी प्रसाद मते यांना गोर सेना राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. संदेश चव्हाण यांच्या सूचनेनुसार देण्यात आले. यावेळी गोर सेनेचे जिल्हाध्यक्ष आर. के. चव्हाण, मोहन पवार, किरण राठोड, किशोर राठोड, प्रकाश चव्हाण, शिवाजी जाधव उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्रातील बंजारा समाज हा विमुक्त जाती 'अ' प्रवर्गात मोडतो. मात्र काही राजपूत व उपरबंद समाजातील व्यक्ती बोगस कागदपत्रांच्या आधारे या प्रवर्गात घुसखोरी करत आहेत. काही प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल असून काही खटले न्यायप्रविष्ट आहेत. तसेच दर महिन्याला कोणत्या जातींची प्रमाणपत्रे दिली गेली, याची यादी प्रसारीत होणे गरजेचे आहे, जेणेकरून आक्षेप घेणे सोपे जाईल. फक्त रक्त नात्यातील व्यक्तीच्या वैधता प्रमाणपत्रावर जात सिद्ध होत नाही. २०१७ च्या अधिनियमात हे स्पष्टपणे नमूद आहे. त्यामुळे १९६१ पूर्वीचा पुरावा अनिवार्य आहे.

# निळवंडेच्या कालव्यातून ओव्हरफ्लोचे पाणी सोडा

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांची पत्राद्वारे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : भंडारदरा व निळवंडे धरण पाणलोट परिसरात यंदा मे आणि जून महिन्यांपासून पाऊस सुरू झाल्याने निळवंडे आणि भंडारदरा धरणांमध्ये पाण्याची समाधानकारक उपलब्धता झालेली आहे. परिणामी या धरणांतून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग नदीमार्गे होत आहे. मात्र दुसरीकडे निळवंडे धरणाच्या लाभक्षेत्रात अद्यापही पुरेसा पाऊस न झाल्याने डाव्या व उजव्या कालव्यातून तातडीने पाणी सोडावे अशी मागणी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली आहे.

### पाणी सोडल्याने शेतकऱ्यांचा झाला फायदा

मागील दोन वर्षापासून कालव्यांमधून पाणी सोडावे, अशी मागणी माजी मंत्री थोरात यांनी केली होती. त्यानंतर प्रशासनाने दोन्ही कालव्यांमधून पाणी सोडल्याने लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा झाला होता. दुष्काळी भागातील १८२ गावांसाठी या धरणाची निर्मिती थोरात यांनी केली असून शेतकऱ्यांच्या अडचणी प्रसंगी ते वेळोवेळी मदतीला धावले आहेत.

निळवंडे धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्यातून लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांसाठी पाणी मिळावे या मागणीचे पत्र मा. मंत्री थोरात यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांना लिहिले आहे.

पत्राद्वारे मागणी करताना माजीमंत्री थोरात म्हणाले की, भंडारदरा व निळवंडे धरणाच्या पाणलोट क्षेत्रात चांगला पाऊस झाल्याने पाण्याची आवक समाधानकारक आहे. त्यामुळे नदी मार्गे मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरू आहे. मात्र, दुसरीकडे निळवंडे धरणाचे लाभक्षेत्र हे पर्जन्य छायेखाली येते, त्यामुळे अद्यापही लाभक्षेत्रात पुरेसा पाऊस झालेला नाही. लाभक्षेत्रात शेतीसाठी व पिण्यासाठी लागणाऱ्या पाण्याची समस्या कायम आहे. हा विरोधाभास लक्षात घेता, निळवंडे धरणातील अतिरिक्त पाणी डाव्या आणि उजव्या कालव्यातून तातडीने सोडणे अत्यावश्यक आहे.



या दुष्काळी पट्ट्यात आत्ताच पाणी सोडले तर ते पाणी अडवले जाईल, जिरवले जाईल आणि त्यातून बरेच क्षेत्र सिंचनाखाली येऊन वर्षभर त्याचा फायदा शेतकऱ्यांना होऊ शकतो. त्यामुळे निळवंडे धरणाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या हितासाठी तात्काळ डाव्या आणि उजव्या दोनही कालव्यांमधून पाणी सोडण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी बाळासाहेब थोरात यांनी केली आहे.

या मागणीमुळे निळवंडे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून शेतकऱ्यांनी धरण व कालव्यांचे निर्माते माजी मंत्री थोरात यांच्या प्रतिकृतज्ञता व्यक्त केली आहे.

# काळेगाव शाळेतील विद्यार्थ्यांनी वेधले ग्रामस्थांचे लक्ष

**जनता आवाज वृत्तसेवा**

**भातकुडगाव फाटा** : महाराष्ट्रातील सर्वात मोठा उत्सव म्हणून पंढरपूर येथे आषाढी एकादशीनिमित्त यात्रा भरते. याच सोहळ्याचे औचित्य साधन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काळेगाव येथील विद्यार्थ्यांनी शाळेचे मुख्याध्यापक संदीप आहेर, उपमुख्याध्यापक लक्ष्मण पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली विठुरायाचा जयघोष करत व वृक्षारोपणाचा संदेश देत वारकरी वेशात दिंडीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले.

दिंडीच्या सांगतेनंतर शिक्षक व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत शालेय परिसरात विविध जातीचे वृक्ष लावण्यात आले. या उपक्रमाचे पालक वर्गातून समाधान व्यक्त होत आहे. महाराष्ट्रातील अनेक थोर संतांचे विचार विद्यार्थ्यांना बालवयातच कळावे. हाच मुख्य उद्देश ठेवून वर्षभर येणारे वेगवेगळे सण व उत्सव साजरे करून कृतीद्वारे विद्यार्थ्यांना ते शिकवले जातात. त्याचाच एक भाग म्हणून या दिंडीचे आयोजन केले होते, असे उपमुख्याध्यापक लक्ष्मण पिंगळे यांनी सांगितले.



# सागर बेग यांना बारामती हिंदू धर्मरक्षक पुरस्कार प्रदान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बारामती** : पुणे जिल्ह्यातील बारामती, इंदापूर या पुरोगामी विचारांचा पगडा असलेल्या तालुक्यांमध्ये विधर्मी जिहाद्यांची ठासून पुरोगाम्यांच्या मनात हिंदुत्व जागवण्याचे पुण्यकार्य करणाऱ्या राष्ट्रीय श्रीराम संघाचे अध्यक्ष सागर बेग यांना बारामती हिंदू धर्मरक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

आषाढी एकादशी निमित्ताने बारामती येथे झालेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती समितीच्या वतीने अहिल्यादेवी होळकर यांचा त्रिशताब्दी जयंती कार्यक्रम बारामती नगरपरिषदे समोरील शारदा प्रांगणात मोठ्या थाटात संपन्न झाला. बारामती, भिगवण आणि इंदापूर तालुक्यातून असंख्य धनगर समाज बांधव उपस्थित होते.

### कार्यक्रमास यांची होती हजेरी

दौंड विधानसभा मतदारसंघाचे आ. राहुल कुल, पुणे कॉन्टोमेंट विधानसभा आ. सुनील कांबळे, आ. योगेश टिळेकर, माळशिरसचे माजी आ. रामभाऊ सातपुते, भाजयुमोचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, मदन मोकाटे यांची प्रमुख उपस्थिती होती.



ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण धर्मरक्षक सागर बेग यांना करण्यात आले. पुण्यश्लोक अहिल्यादेवींची सुबक मूर्ती देऊन बेग यांना यावेळी गौरवण्यात आले.

याप्रसंगी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे भाषण झाले. तर इतर नियोजित कार्यक्रमामुळे जत विधानसभेचे आ. गोपीचंद पडळकर यांना या कार्यक्रमास उपस्थित राहता आले नाही.

# कर्जत-चौंडी रस्त्याच्या कामात गवंडीगल्लीचा समावेश : घुले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : कर्जत ते चौंडी रस्त्याच्या कामामध्ये गवंडी गल्लीचा समावेश करण्यात आला आहे, अशी माहिती नगराध्यक्ष रोहिणी घुले यांनी पत्रकारांना दिली.



सार्वजनिक बांधकाम विभागाने डांबरी सडकेवर टाकला मुरूम या मथळ्याखाली बातमी आम्ही प्रसिद्धी केली होती. याची दखल घेत नगरपंचायतच्या नगराध्यक्ष रोहिणी घुले, नगरसेवका सुवर्णा सुपेकर यांनी विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांची मुंबई येथे जाऊन भेट घेतली. सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेल्या प्रतापाची माहिती दिली. राम शिंदे यांनी देखील तात्काळ दखल घेत २०० कोटी रुपयांचा कर्जत ते चौंडी कुसडगाव हा रस्ता चोंडी येथे झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

हा रस्ता आता गवंडी गल्ली येथून करण्याचा निर्णय यावेळी राम शिंदे यांनी घेतला एवढेच नव्हे, तर त्यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना याबाबत सूचना देखील दिल्या आहेत, अशी माहिती रोहिणी सचिन घुले यांनी दिली.

### सभापती शिंदे यांनी घेतली दखल

गवंडी गल्ली मध्ये असणाऱ्या डांबरी रस्त्यावर सर्व बांधकाम विभागाने मुरूम टाकला ऐन पावसाळ्यामध्ये नागरिकांचे हाल होत असल्यामुळे त्याची दखल नगराध्यक्ष घुले यांनी घेत थेट सभापती राम शिंदे यांचे लक्ष वेधले आणि त्यांनी देखील तात्काळ हा प्रश्न सोडवला आहे.

# बेकायदेशीर विद्युत पोल हटवण्यासाठी उपोषण

## मुंबई मंत्रालयाच्या प्रधान सचिवांकडून संबंधित पोल हटवण्याचे आदेश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : तालुक्यातील नांदूर निंबादैत्ये-येळी मार्गालगत जीएसई रिन्यूएबल एनर्जी प्रा. लि. कंपनीने उभारलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पातील ४९ बेकायदेशीर विद्युत पोल हटवण्यासाठी स्थानिक ग्रामस्थांनी आणि भाजपाचे प्रा. दादासाहेब खेडकर यांच्या नेतृत्वाखाली सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

या प्रकरणात थेट मुंबई मंत्रालयाच्या सार्वजनिक बांधकाम प्रधान सचिव मनीषा म्हैसकर पाटणकर यांनी हस्तक्षेप करत संबंधित पोल हटवण्याचे आदेश सार्वजनिक बांधकाम विभागीय आयुक्त, कार्यकारी अभियंता अहिल्यानगर व महावितरण उपविभाग पाथर्डी यांना दिले आहेत.

### प्रशासनाच्या कारवाईकडे सर्वांचे लक्ष?

महावितरण व सार्वजनिक बांधकाम विभागाने संयुक्तरित्या पुढील ७ दिवसांत ही कारवाई करून मंत्रालयात अहवाल सादर करावयाचा आहे. त्यामुळे जिल्ह्यात या प्रकरणातील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या आदेशानुसार, येत्या ७ दिवसांत पोल काढून त्याचा लेखी अहवाल मंत्रालयात सादर करणे बंधनकारक आहे.प्रकल्प अंतर्गत नांदूर निंबादैत्य येथून येळी गावापर्यंतच्या प्रजिमा क्रमांक १४ व ३८ या ग्रामीण रस्त्यालगत हे पोल उभारण्यात आले असून ते वाहतुकीस व जीवितास गंभीर धोका निर्माण करीत आहेत. संबंधित पोल ३३ के.व्ही. विद्युत रोहित्रासाठी टाकण्यात आले आहेत. या आंदोलनाला अमोल गर्जे, किसन आव्हाड, प्रा. सुनील पाखरे, उत्तम गर्जे, अँड. आत्माराम वांढेकर, महादेव बटूळे, अशोक दहिफळे, दीपक फाजगे, भीमराव दहिफळे आदींनी पाठिंबा दिला आहे.



# शिवसेनेच्या जिल्हा पदावर निवड हे निष्ठेचे फळ : उजघरे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : माझ्या सामान्य व निष्ठावन शिवसैनिकाला पक्षात महत्त्वाचे पद असलेले ते ही जिल्हा पातळीवरील अहिल्यानगर जिल्हा सन्मवयक पदाची जबाबदारी मला दिली. हे माझ्या निष्ठेचे फळ असल्याचे प्रतिपादन अळकुटीचे माजी सरपंच व जुने निष्ठावंत शिवसैनिक सखाराम उजघरे यांनी केले.

उजघरे म्हणाले की, पारनेर तालुक्यातील पहिले शिवसेनेचे अळकुटी गावचे सरपंच म्हणून बहुमान मिळाला. शिक्षण एमएबीएडपर्यंत झाले असताना केवळ शेतीच्या आणि समाजसेवेची आवड असल्याने नोकरीचा विचार न करता सामाजिक व राजकीय क्षेत्रात कोणताही कौटुंबिक राजकीय वारसा नसताना मोठ्या गावचे सरपंच पद व प्रशासक पद भूषवले. तेव्हा गाव म्हणजे कुटुंब हे समजून मनापासून अतिशय चांगले काम केले.



भाजप शिवसेना युतीच्या काळात दिवंगत माजी मंत्री अनिल राठोड यांच्या नेतृत्वाखाली अनेक शासकीय पदे भूषविली. पण नुसती पदे न भूषविता, प्रत्यक्षात अनेक समाजोपयोगी कामे केली.

> माझ्या सारख्या ग्रामीण भागातील एका सामान्य पण निष्ठावान शिवसैनिकाला जिल्हा पातळीवर महत्त्वपूर्ण असलेल्या जिल्हा समन्वयक पदावर माझी नेमणूक करून काम करण्याची संधी दिली. या संधीचे सोने केल्या शिवाय राहणार नाही.
>
> **– सखाराम उजगरे**

# आमदारांच्या उपस्थितीत समाजहिताचे उपक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**गंगापूर** : गंगापूर तालुक्यातील भिव धानोरा येथील सामाजिक कार्यकर्ते गणेश पाटील चव्हाण यांचा शनिवारी अभिष्टचिंतन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून तालुक्याचे आ. प्रशांत बंब यांची उपस्थिती होती. तर प्रमुख पाहुणे म्हणून संतोष माने, अमोल जगताप, विशाल गायकवाड यांसह आदी उपस्थिती होती.



या सोहळ्याप्रसंगी वृक्षारोपण तसेच गंगापूर येथील गोकुळधाम गोशाळेस दोन ट्रॅक्टर हिरव्या चाऱ्याचे दान करण्यात आले. त्याचबरोबर मोठ्या बडे जाव पणाला फाटा देत भेट रुपी आलेल्या शालेय साहित्याचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. यावेळी जयेश निरपळ, भाग्येश गंगावाल, राहुल वानखेडे, आनंद पाटील, सोपान देशमुख, परमेश्वर कदम, बाबासाहेब गायके, तुकाराम सटाले, रामेश्वर चव्हाण, आप्पासाहेब पाचपुते, अरुण सागर, राजेंद्र सावंत, आबासाहेब सवई, दिलीप शिंदे, प्रमोद मुगदिया, विनोद बोकडिया, श्रीराम जोशी, सचिन विधाटे, जमील पठाण, अमोल शिंदे, ज्ञानेश्वर अमृते, नारायण पठाडे, विठ्ठल म्हस्के, गंगापूर गोशाळेचे गणेश पुराणिक, चंद्रकांत लांडे यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# पाथर्डी मोफत कृत्रिम अवयव वितरण शिबिर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : पाथर्डी येथील उपजिल्हा रुग्णालयात दिव्यांग बांधवांसाठी आयोजित करण्यात आलेल्या एकदिवसीय कृत्रिम अवयव प्रत्यारोपण मोफत शिबिरास दिव्यांगांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या शिबिरात ८० हून अधिक लाभार्थ्यांना कृत्रिम हात, पाय, कॅलिपर्स यांचे मोजमाप करून तात्काळ मोफत वितरण करण्यात आले. शिबिराचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे दिव्यांगांना एका ठिकाणीच आवश्यक सर्व साहित्य उपलब्ध झाल्यामुळे त्यांचा वेळ, पैसा आणि मानसिक त्रास टळला.

> दिव्यांगाना मोठ्या शहरांत जावून वेळखाऊ प्रक्रिया करावी लागणार नाही. आजच शिबिरात मोजमाप घेऊन काही तासांत कृत्रिम हात, पाय, कॅलिपर्स यांचे वितरण करण्यात आले. दिव्यांगांच्या गरजा ओळखून तत्काळ सेवा देणे हेच आमचे उद्दिष्ट आहे.
>
> **– डॉ. सचिन दरंदले, वैद्यकीय अधिकारी**



या शिबिराचे आयोजन डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन संचलित जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय, जिल्हा परिषद, जिल्हा रुग्णालय अहिल्यानगर, एलिम्को कानपूर आणि एस. आर. ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. हे पाथर्डी उपजिल्हा रुग्णालयात आयोजित झालेले दिव्यांगांसाठीचे पहिलेच व्यापक शिबिर होते.

शिबिराचे उद्घाटन तालुका आरोग्य अधिकारी डॉ. भगवान दराडे यांच्या हस्ते झाले. यावेळी उपजिल्हा रुग्णालयाचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन दरंदले, एस. आर. ट्रस्टचे संचालक डॉ. रुपेश जाधव, डॉ. एस. एस. चुमले, अपंग प्रहार संघटनेचे तालुकाध्यक्ष अशोक खेडकर, शहराध्यक्ष हुमायून आतार, बंडू पाटील बोरुडे, दशरथ हंडाळ, नवयोदय ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा अनिता निऱ्हाळी, सचिव ज्योती तरवडे, बालगृहाचे मुख्याध्यापक सचिन तरवडे, प्रताप निऱ्हाळी आदी मान्यवर उपस्थित होते.

# निपाणी वडगावातील विकासकामांसाठी प्रयत्नशील

## आ. अमित गोरखे; मातंग अस्मिता संघर्ष सेना व भीमशक्ती संघटनेचे निवेदन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर तालुक्यातील निपाणी वडगाव येथील विविध विकासकामे करण्याचे प्रयत्न करू, असे आश्वासन आ. अमित गोरखे यांनी कार्यकर्त्यांना दिले आहे.

मातंग अस्मिता संघर्ष सेना जिल्हाध्यक्ष तसेच भीमशक्ती जिल्हा कार्याध्यक्ष विलास जाधव तसेच संघटनेचे पदाधिकारी यांनी मुंबई येथील विधानभवन या ठिकाणी निपाणी वडगाव येथील विविध विकास कामाच्या संदर्भात आ. अमित गोरखे यांना लेखी स्वरुपात निवेदन देऊन मागणी केली.

> आ. गोरखे यांनी सर्व बाबींचा विचार करून लवकरच विकास कामासाठी वरिष्ठ स्तरावरून निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे आश्वासन दिले. तसेच निपाणी वडगाव येथील सामाजिक आणि नागरी समस्या शासन पातळीवर मांडल्याने याची पूर्तता व अंमलबजावणी लवकरच होणार आहे.
>
> **– भागचंद नवगिरे, जिल्हाध्यक्ष**





यावेळी अतिक्रमण नागरिकांचे नियमित करणे तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे भवन, समाज मंदिर बांधकामासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून मिळावा. तसेच विविध विकास कामाच्या संदर्भात मागणी केली.

# डॉ. कडू शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्टता पुरस्काराने सन्मानित

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : इंटरनॅशनल सोसायटी ऑफ ऑटोमेशन, अमेरिकेच्या, पुणे विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सायबर सेक्युरिटी कॉन्फरन्समध्ये डॉ. चंद्रकांत कडू यांना शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्टता पुरस्काराने करम रेहान, दिलीप मिस्किन, एच. एस. पानसरे व गुरमीत आनंद या मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

आयएसए पुणे सेक्शन हे इंटरनॅशनल सोसायटी ऑफ ऑटोमेशन अमेरिका यांच्या विभागांपैकी एक उत्कृष्ट शाखा असून ज्यामध्ये पाचशेहून अधिक व्यावसायिक आणि विद्यार्थी सदस्य आहेत. डॉ. कडू यांची



शैक्षणिक कारकीर्द दोन दशकाहून अधिक काळाच्या प्रवासात निरंतर शिक्षण संशोधन आणि संस्थात्मक विकासाला समर्पित राहिलेली आहे. प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालय लोणी येथे इन्स्ट्रुमेंटेशन अँड कंट्रोल इंजिनिअरिंग विभागाचे विभाग प्रमुख, एनबीए कॉर्डिनेटर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात इन्सुमेंटेशन विभागाच्या अभ्यास मंडळाचे चे समन्वयक म्हणून त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे.

### दिग्गज मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव

डॉ. कडू यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषद माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, खा. डॉ. सुजय विखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुष्मिता विखे, सहसचिव भारत घोगरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, प्राचार्य डॉ. संजय गुल्हाने, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, पालकवर्ग व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

# ‘युवक’च्या पदाधिकाऱ्यांची वज्रमुठ तयार करणार

## डॉ.जयश्रीताई थोरात; घुलेवाडी येथे युवक काँग्रेसच्या १६ शाखांचे उद्‌घाटन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी कायम गोरगरीब सर्वसामान्य माणसाच्या सर्वांगीण विकासासाठी अविश्रांत काम केले आहे. ते काँग्रेस पक्षाची कायम एकनिष्ठ असून काँग्रेस पक्ष हा राज्यघटनेला मानणारा आहे. या पक्षात सर्वांना समान संधी आहे. काँग्रेस पक्ष हा कधीही न संपणारा पक्ष आहे. आगामी काळातही या पक्षात तरुणांना मोठ्या संधी आहे. युवक काँग्रेसच्या सर्व पदाधिकाऱ्यांची वज्रमुठ तयार करून तालुक्याच्या विकासासाठी आपण उपयोगात आणणार असल्याचे प्रतिपादन काँग्रेसच्या युवा नेत्या डॉ. जयश्री थोरात यांनी केले.



घुलेवाडी येथे डॉ. थोरात यांच्या उपस्थितीमध्ये रिमझिम पावसात युवक काँग्रेसच्या १६ शाखांची उद्घाटन करण्यात आली. यावेळी तालुकाध्यक्ष अजय फटांगरे, माजी जि. प. सदस्य सिताराम राऊत, घुलेवाडीच्या सरपंच निर्मला राऊत, दलित पँथरचे राजू खरात, बाळासाहेब पानसरे, अंकुश ताजने हिरालाल पगडाल, डॉ. विजय पवार, राजू आव्हाड, अनिकेत अभंग, रवि गिरी, अभिषेक तामचीकर, जीवन गायकवाड, भास्कर पानसरे, सचिन सोनवणे, सचिन शेलार आदींसह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

थोरात म्हणाल्या की, घुलेवाडी गाव हे तालुक्यातील राजकीय व सामाजिक दृष्ट्या महत्त्वाची गाव आहे. या गावात अनेक जाती धर्मांचे लोक गुण्यागोविंदाने राहत आहे. सहकाराचे रोपटे हे खऱ्या अर्थाने घुलेवाडी गावातच रोवले. आणि त्याचा तालुक्यात वटवृक्ष तयार झाला. लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी सुसंस्कृत विचारातून तालुका उभा केला. मात्र आता दुर्दैवाने काहीजण ही विचारधारा मोडू पाहत आहे. त्यांना आपण वेळीच रोखले पाहिजे. तरी सर्वांनी चांगल्या गोष्टीशी पाठीशी खंबीरपणे उभे राहावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

यावेळी अजय फटांगरे म्हणाले की, घुलेवाडी हे गाव विधानसभा निवडणुकीत मोठे आहे. आणि या गावात युवक काँग्रेसच्या अनेक शाखा निर्माण झाल्या आहेत. गावातील व वार्डातील विविध प्रश्न सोडवण्यासाठी शाखातील सर्व युवकांनी पुढाकार घ्यावा. प्रश्न तातडीने कशी मार्गी लागतील याबाबत नियोजन करावे. भविष्यात काँग्रेस पक्षाला नक्कीच चांगले दिवस येणार आहे. याप्रसंगी हिरालाल पगडाल, शरद पावबाके, ओमकार बिडवे यांची ही भाषणे झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष राऊत यांनी केले, सूत्रसंचालन हरी ढमाले यांनी केले तर आभार स्वाती राऊत यांनी मांडले. यावेळी घुलेवाडी तील नागरिक, तरुण व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रिमझिम पावसात तरुणाईचा प्रतिसाद

घुलेवाडी हे राजकीय दृष्ट्या मोठे गाव आहे. साई श्रद्धा चौक, एकता चौक, माझे घर सोसायटी, गावठाण, घुलेवाडी फाटा, मौनगिरी चौक, गवलदरा, कानिफनाथ मळा अशा विविध १६ ठिकाणी रिमझिम पाऊस सुरू असतानाही फटाक्यांची आतिषबाजी ढोल ताशांचा गजर आणि तरुणाईच्या मोठ्या उत्साहात शाखांचे उद्घाटन झाले. डॉ जयश्री थोरात यांच्या नेतृत्वात घुलेवाडी मधील एकत्रित झालेली तरुणाई ही या उद्घाटन शाखांचे मोठे वैशिष्ट्य ठरले. यावेळी नामदार बाळासाहेब थोरात जिंदाबाद काँग्रेस पक्ष जिंदाबादच्या घोषणांनी घुलेवाडी दुमदुमून गेली.

# सुसरे गावात एकादशीनिमित्त बालदिंडी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : सुसरे (ता.पाथर्डी) येथे आषाढी एकादशीनिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुसरे,पांढरवस्ती व धसवस्ती यांच्या संयुक्त विद्यमाने पायी बालदिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

या दिंडीमध्ये ग्रामस्थ भजनी मंडळी यांनी सहभाग घेतला. दिंडीची सुरुवात गावातून होऊन भजनी मंडळींनी पारंपरिक भजने सादर करत विठूरायाचा गजर केला. पुंडलिक वरदा हरी विठ्ठलचा जयघोष करत बालगोपाळ विठोबा-रुख्मिणीच्या वेषात सहभागी झाले. शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना म्हस्के, शिक्षिका जयश्री पाटील, अर्चना बडे, वैशाली कंठाळी, शैलेश



चातुर, संतोष गिरी, पांढरवस्ती शाळेचे मुख्याध्यापक संदीप महामुनी, बप्पासाहेब शेळके, तसेच धसवस्ती शाळेचे मुख्याध्यापक अदिनाथ शेळके, अशोक वामन, शिक्षिका अनिता उदागे, जिजाबाई मिसाळ, आशा बन, संगीता तेलोरे, मंगल कंठाळी, वंदना शिंदे, वैशाली कंठाळी,अनिता धस यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

# निरोगी समाजासाठी विषमुक्त शेती गरजेची : डॉ. तांबे

## मनोली येथे आधुनिक उपकरण ड्रोनद्वारे फवारणी प्रात्यक्षिक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : भारत हा कृषिप्रधान देश आहे. मात्र, शेती पिकांना शाश्वत हमीभाव नसल्याने शेती तोट्यात आहे. सरकारने शेतीसाठी ठोस धोरण जाहीर करण्याची गरज निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांनी रासायनिक खतांचा वापर न करता पारंपरिक पद्धतीने सेंद्रिय खतांचा वापर केला पाहिजे. निरोगी समाजासाठी विषमुक्त शेती करणे गरजेचे बनले आहे, असे प्रतिपादन माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी केले.



संगमनेर तालुक्यातील मनोली येथे देहात ॲग्रो इंडस्ट्रीमार्फत आधुनिक उपकरणांच्या साहाय्याने शेती प्रत्यक्ष फवारणी प्रात्यक्षिक कार्यक्रमात डॉ. तांबे बोलत होते. याप्रसंगी काँग्रेसच्या युवा नेत्या डॉ. जयश्री थोरात, थोरात साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष बाबा ओहोळ, बाबासाहेब शिंदे, केशव शिंदे, डॉ. नरेश शेजवळ, डॉ. गंगाधर चव्हाण, विशाल राजेभोसले, दिग्विजय सिंग, कार्तिक नायर, प्रभाकर बेंद्रे, अभिजीत बेंद्रे, शरद बेंद्रे, संकेत बिडवे, सुनील बेंद्रे, अभिषेक क्षीरसागर उपस्थित होते.

डॉ. तांबे म्हणाले, लहान मुलांचे जसे आपण संगोपन करतो, तसे सजीव असलेल्या पिकांचे संगोपन करणे गरजेचे आहे. जुन्याकाळी शेतीसाठी कंपोस्ट खतांचा जास्त वापर केला जात होता. मात्र, सध्या रासायनिक खतांचा भडीमार केला जात आहे. माणसाच्या आरोग्याप्रमाणेच शेतीचे आरोग्य आहे. शेतीचे आरोग्य जपले पाहिजे. यासाठी शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीवर भर दिला पाहिजे. तरुणांनी शेतीकडे व्यवसाय म्हणून पाहिले आणि त्यामध्ये अत्याधुनिक प्रयोग केले तर नक्कीच शेती परवडणारी होणार आहे. शेती ही आपले भूषण आहे. शेतकऱ्यांनी शेती करताना नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे आवाहन डॉ. जयश्री थोरात यांनी केले.



# डॉ. विखेंनी घेतली भाजप प्रदेशाध्यक्षांची भेट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : भारतीय जनता पक्षाचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची डॉ. सुजय विखे पाटील यांनी मुंबईत भेट घेतली. पक्ष संघटनेतील एका अत्यंत महत्त्वाच्या आणि जबाबदारीच्या पदाची सूत्रे स्वीकारल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन करत, आगामी वाटचालीसाठी शुभेच्छांचा मनःपूर्वक निरोप त्यांनी दिला.डॉ. सुजय विखे पाटील यांची भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र राज्य परिषदेचे सदस्य (२०२५-२८) म्हणून निवड झाल्याबद्दल प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिलेल्या पाठिंब्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

या भेटीच्या निमित्ताने राज्याच्या राजकीय घडामोडींवर चर्चा झाली. पक्षाचे कार्य व्यापक स्तरावर पोहोचवण्यासाठी आणि कार्यकर्त्यांपर्यंत प्रभावी नेतृत्व पोहचवण्यासाठी रवींद्र चव्हाण साहेबांचे नेतृत्व महत्त्वपूर्ण ठरेल, असा ठाम विश्वास डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केला. पक्षाचे विचार जनतेपर्यंत पोहचवताना संघटनेचा विस्तार आणि कार्यकर्त्यांची नाळ अधिक घट्ट करण्यासाठी चव्हाण निश्चितच नवा अध्याय सुरू करतील, असे मतही विखे यांनी व्यक्त केले. या भेटीदरम्यान सौहार्दपूर्ण वातावरण पाहायला मिळाले आणि आगामी काळात परस्पर सहकार्य अधिक दृढ होईल, अशी आशा व्यक्त करण्यात आली.

# मुळे विद्यालयात रंगला बाल दिंडी सोहळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : येथील श्री गुरुदेव दत्त शिक्षण संस्थेच्या कै.अनिल दिंगबर मुळे प्राथमिक शाळेने संस्थेचे अध्यक्ष महंत संजय (बापू) कुलकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली आषाढी एकादशीनिमित्त बाल दिंडीचे आयोजन केले होते.या दिंडीचे मुख्य आकर्षण विठ्ठल रखुमाई, विविध संताची वेषभूषा केलेले बालगोपाल, वारकरी, झेंडेकरी, भजनी बाल मंडळ, पालखीवाले, टाळकरी, विठ्ठल नामाचा जयघोष करत परिसरातील मंदिरांना भेटी दिल्या.पालखीचे पूजन शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती ज्योत्स्ना देठे यांनी केले. या सोहळ्याला पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.दिडींचा समारोप शाळेच्या आवारात करण्यात आला. यावेळी विठू नामाचा गजर करत मुली, शिक्षिका, पालक यांनी फुगडीसाठी फेर धरला.विविध अंभगावर मुलींनी नृत्य सादर केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक, पालक, विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्रीमती ताजणे यांनी केले तर दिंडीच्या कार्यक्रमाचे नियोजन श्रीमती अमृता अकोलकर यांनी केले.

# रेल्वेचे पोल त्वरीत हटविण्याची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणतांबा** : पुणतांबा- श्रीरामपूर रस्त्यावर रेल्वेने लावलेले पोल त्वरित हटवावे, अशी मागणी माजी सरपंच मुरलीधर थोरात यांनी केली असून आपली हद्द सोडून रेल्वेने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीमध्ये पोल रोवून मनमानी केली आहे. या रस्त्यावर अपघात होण्याची शक्यता असून सार्वजनिक बांधकाम विभागाने यात लक्ष घालून रेल्वेची व बांधकाम विभागाची हद्द निश्चित करावी व लावलेले पोल हटवावे, अशी मागणी थोरात यांच्यासह ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभाग श्रीरामपूर यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

पुणतांबा- श्रीरामपूर रस्त्याच्या कडेला लोखंडी पोल उभे करून आपली हद्द निश्चित केल्याची समजते रस्त्याच्या कडेलाच हे पोल उभे केल्यामुळे या रस्त्यावर मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. वाहतूक मोठ्या प्रमाणावर असते. त्यामुळे ही लावलेले पोल अपघाताला निमंत्रण देणारे आहे, याची माहिती कळताच माजी सरपंच मुरलीधर थोरात यांनी रेल्वे विभागाशी संपर्क साधला लावलेले पोल त्वरित हटवावे, अशी मागणी केली.

पुणतांबा- श्रीरामपूर हा रस्ता साराजनिक बांधकाम विभाग श्रीरामपूर यांच्याकडे वर्ग असून या विभागाशी संपर्क साधण्यात आला असून ग्रामपंचायतच्या वतीने लेखी पत्र देण्यात आले आहे. लावलेले पोल त्वरित हटवावे सार्वजनिक बांधकाम विभागाने आपली हद्द निश्चित करून हा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी थोरात यांच्यासह ग्रामस्थ वर्गाने केली आहे.

रेल्वेच्या मनमानी कारभाराबाबत ग्रामस्थांमध्ये नाराजी असून रेल्वेची मनमानी व गावातील असंघटितपणा याचा फायदा घेत असल्याचा आरोप माजी सरपंच मुरलीधर थोरात यांनी केला आहे. रेल्वे प्रशासनाने हे धोकादायक पोल त्वरीत हटविण्याचीही मागणी त्यांनी केली आहे.

# शिक्षकांच्या मागण्या मार्गी लावाव्यात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : राज्यातील शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत नवनियुक्त उपसंचालक (शालेय शिक्षण) डॉ. गणपत मोरे यांच्याकडे प्रा. रुपाली कुरूमकर यांनी लेखी मागणी सादर केली. शिक्षक सेवेसंदर्भातील प्रलंबित प्रस्ताव तातडीने मार्गी लावण्याची मागणी त्यांनी या निवेदनातून केली आहे.

या निवेदनात वैयक्तिक मान्यता प्रस्ताव बाबत प्रा. रूपाली कुरुमकर यांनी म्हटले आहे की, अनेक शिक्षकांचे सेवामान्यता प्रस्ताव विभागीय कार्यालयात वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. यामुळे सेवा पुस्तक पूर्ण होण्यास अडचणी येत आहेत. वरिष्ठ वेतनश्रेणी व निवड वेतनश्रेणी पात्र शिक्षकांना वेळेत वेतनश्रेणी मिळत नसल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. ही प्रक्रिया गतीने पार पाडावी.

मेडिकल बिल मंजुरी शिक्षकांच्या वैद्यकीय खर्चावर शासन नियमानुसार मंजुरी



मिळणे अपेक्षित असताना संबंधित बिले अनेक महिन्यांपासून प्रलंबित आहेत. विना अनुदानित व अंशतः अनुदानित शाळांवरील १०० टक्के अनुदान प्रस्ताव शासनाने यासंदर्भात निर्णय जाहीर केले असले तरी त्याची अंमलबजावणी न झाल्याने शिक्षक आर्थिक अडचणीत आहेत. वैयक्तिक अनुदानित मान्यता प्रस्ताव नव्याने अनुदानित पदांवरील शिक्षकांच्या प्रस्तावांवर त्वरीत निर्णय घेण्याची गरज आहे.

# बीएसएनएल प्रथम क्रमांकावर दिसेल

## ॲड. बोरावके व गायकवाड यांचा नागरी सत्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : भारतीय दूरसंचार निगमच्या कारभाराबद्दल दूरध्वनी धारकांच्या असलेल्या तक'री व गैरसमज दूर करून उत्तम सेवा देणारी कंपनी म्हणून सेवा देण्याचा प्रयत्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येईल. टेलिफोन निगमचे नूतन संचालक ॲड. रवींद्र बोरावके यांनी केले.



(छाया-सुनील पांढरे)

माळी बोर्डींग, श्रीरापूर येथे माळी बोर्डींग, समता प्रतिष्ठान व अखिल भारतीय महात्मा फुले, समता परिषद आदींच्या संयुक्तीक विद्यमाने नॅशनल ग्रीड इंडीया व दिल्ली येथे भारत संचार निगमच्या संचालकपदी नियुक्ती झाल्याबद्दल ॲड. रवींद्र बोरावके व आरोग्य मित्र, नागेबाबा परिवाराचे सदस्य सुभाषराव गायकवाड यांना महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी बोरावके बोलत होते. कार्यक'माच्या अध्यक्षस्थानी जिल्हा बँकेचे संचालक माजी उपनगराध्यक्ष करण ससाणे होते.याप्रसंगी आ. हेमंत ओगले, काँग'सचे जिल्हा कार्याध्यक्ष सचिन गुजर, श्री इम्पेक्सचे संचालक विजय कुदळे, कोपरगाव माळी बोर्डींगचे अध्यक्ष बाळासाहेब पांढरे, श्रीरामपूर माळी बोर्डींग अध्यक्ष दीपक गिरमे, विश्वस्त सुरेंद्रनाना गिरमे व पदाधिकारी, समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष प्रकाश कुऱ्हे, तालुकाध्यक्ष चंद्रकांत झुरंगे, विवेक गिरमे, प्राचार्य टी. ई. शेळके, प्रा. डॉ. बाबुराव उपाध्ये, शंकर गागरे, शिवाजीराव बारगळ, शशांक रासकर, जालिंदर कुऱ्हे, सुनील सोनवणे, बाळासाहेब हरदास, सुभाष वाघुंडे, सचिन गिरमे आदी उपस्थित होते.

# शिवराई येथे जनावरांचे लसीकरण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर** : वैजापूर तालुकयातील शिवराई येथे वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ संलग्न दादासाहेब पाटील कृषी महाविद्यालय, दहेगाव यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत जनावरांची लसीकरण शिबिर पार पडले. यावेळी तिथे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. बैनाडे, कार्यक्रम अधिकारी प्राचार्य एस. बी. बडे, विषय विशेष तज्ञ डॉ. धुमाळ, प्रा. मगर यांनी मार्गदर्शन केले. जनावरांमध्ये वाढत जाणारे लम्पी या रोगाचे लसीकरण करण्यात आले. या कृषी कार्यानुभव उपक्रमात कृषीकन्या, ऐश्वर्या तांबे, उर्मिला काकडे, उत्कर्षा जाधव, शिवकन्या त्रिभुवन, आदिती जाधव, साक्षी त्रिभुवन, किरण नागरे, राजेश्वरी गोलाईत, रितिका गलुले यांनी सहभाग घेतला. याप्रसंगी सर्व शेतकरी बांधव तेथे उपस्थित होते.

# जिल्ह्यात होणार नव्याने १७३ स्वस्त धान्य दुकाने

## संगमनेरमध्ये ३५, पारनेर ३८ तर अकोलेत ३२ नवीन रेशन दुकान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : जिल्हा पुरवठा विभागाने विविध कारणांनी रद्द केलेले परवाने, चालकाने राजीनामा दिलेला, तसेच अद्याप गावात रेशन दुकान नसलेल्या जिल्ह्यातील १७३ ठिकाणी नवीन स्वस्त धान्य दुकान सुरु करण्यास शासनाने मंजूरी दिली आहे. जिल्ह्यात नव्याने मंजूरी मिळालेल्या रेशन दुकानात सर्वाधिक पारनेर तालुक्यात ३८ गावांत, संगमनेरमध्ये ३५ तर अकोले तालुक्यातील ३२ गावांचा समावेश आहे. या ठिकाणी ३१ जुलैपर्यंत इच्छूकांना पुरवठा विभागाकडे अर्ज करता येणार आहे.


जिल्ह्यातील १ हजार ८८७स्वस्त धान्य दुकानातून २९ लाख ६६ हजार लाभार्थ्यांना



धान्याचे वाटप केले जाते. अंत्योदय योजनेचे ८७ हजार कार्डधारकांना असून ३ लाख ८६ हजार लाभार्थी आहेत तर प्राध्यान्य कुटुंब योजनेचे ६ लाख ३७ हजार कार्डधारक असून २५ लाख ६३ हजार लाभार्थी आहेत. पुरवठा विभागाने ग्रामीण भागात १६४ व नगर शहरातील ९ ठिकाणी नवीन स्वस्त धान्य दुकान सुरु करण्यास निविदा प्रसिद्ध केली. ३१ जुलैपर्यंत इच्छूकांना जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर किंवा संबंधित तहसिल कार्यालयाचा पुरवठा शाखेकडे अर्ज करता येणार आहे. शासनाने ठरवलेल्या प्राधान्यक्रमानुसार दुकानांना मंजुरी देण्यात येणार आहे.

महिला बचत गटांना प्राधान्य रेशन दुकानासाठी पहिले प्राधान्य ग्रामपंचायत (संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था) तर दुसरे प्राधान्य बचत गटांना असणार आहे. यानंतर नोंदणीकृत सहकारी संस्था तसेच सार्वजनिक संस्था किंवा सार्वजनिक न्यास यांचा विचार केला जाणार आहे.

प्राप्त अर्जापैकी एकाची निवड जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समिती करणार आहे. बचत गटाला परवाना देताना महिला ग्रामसभेची शिफारस विचारात घेऊन अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे. दुकानाचे व्यवस्थापन महिला किंवा त्यांच्या समुहाद्वारेकरणे आवश्यक आहे. संबंधित संस्थेला पोलिस विभागाचा चारित्र्य पडताळणी अहवाल बंधनकारक आहे.




# कॅलिडोस्कोप

## पार्सलमधून आला नाग!




**आ**जकाल ऑनलाईन खरेदीचा जमाना आहे. आपल्यापैकी अनेक जण बरेच सामान ऑनलाइन ऑर्डर करत असतात. बंगळुरूमधील एक जोडप्यानेही ऑनलाइन सामान मागवले. पण डिलिव्हरी झाल्यावर त्यांनी सामानाचा बॉक्स उघडला, तेव्हा समोरचं दृश्य पाहून त्यांची दातखिळीच बसली. बॉक्स उघडताच त्यांच्यासमोर एक कोब्रा फुत्कार टाकताना दिसला. ते पाहून जोडप्याची भीतीने गाळण उडाली.

ॲमेझॉनवरून आलेल्या सामानात साप असल्याचा दावा त्या जोडप्याने केला असून त्याबद्दल त्यांनी 'सोशल मीडिया'वर पोस्टही शेअर केली. नशीबाने तो साप त्या बॉक्सच्या चिकटपट्टीला चिकटला होता. त्यामुळे त्यांना इजा झाली नाही. तो मोकळा असता तर कोणाला चावूही शकला असता. या घटनेमुळे ई-कॉमर्स कंपन्यांचे पॅकेजिंक आणि डिलीव्हरी प्रक्रियेवरून नवा वाद सुरू झाला आहे.

त्यांच्या सांगण्यानुसार, दोन दिवसांपूर्वी ॲमेझॉनवरून एक्सबॉक्स कंट्रोलर मागवला होता. परंतु त्यांनी पॅकेट उघडल्यानंतर आतमध्ये जिवंत साप पाहून त्यांना धक्काच बसला. सुदैवाने साप पॅकेजिंग टेपमध्ये अडकला. अन्यथा आमच्या घरातील किंवा अपार्टमेंटमधील इतर लोकांना त्रास होऊ शकला असता. एवढ्या निष्काळजीपणानंतरही ॲमेझॉन त्यांचे ऐकत नसल्याचा आरोप केला. कस्टमर केअरच्या कर्मचाऱ्यांनीही त्यांना दोन तास फोनवर अडकवून ठेवले. त्यामुळे मध्यरात्रीच्या सुमारास त्यांना नाहक त्रासाचा सामना करावा लागला. ई-कॉमर्स कंपन्यांनी त्यांचे पॅकेजिंग आणि वितरण प्रक्रिया अधिक सुरक्षित आणि विश्वासार्ह बनवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, अशी मागणी या घटनेनंतर केली गेली.

## इमारती चोरांच्या ताब्यात!

**स्पे**नसारख्या प्रगत देशातल्या काही इमारतींचं बांधकाम अपूर्ण असून त्या चोरांच्या ताब्यात आहेत, यावर अनेकांचा विश्वास बसणार नाही. पण हे खरं आहे. २००८ मध्ये आलेल्या आर्थिक मंदीचा भारत, अमेरिकेसह अनेक देशांवर परिणाम झाला. बरेच देश या धक्क्यातून सावरले. पण स्पेनवर या मंदीचा परिणाम दिर्घकाळ राहिला. तब्बल ३४ लाख घरं अपूर्ण अवस्थेत आहेत. त्यामुळे कोणी त्यांना हात लावायला तयार नाही. यात वॅलेंसियातल्या हाउसिंग सोसायटीतली घरंही आहेत. या घरांची एकूण किंमत भारतीय चलनात ३.५ लाख कोटी रुपयांच्या आसपास असल्याचं बोललं जातं. आता ही घरं पाडून टाकायचा सरकारचा विचार आहे. पण त्याला प्रचंड खर्च येणार आहे. या प्रकल्पांचा



इथल्या बांधकाम व्यावसायिकांनी त्या काळात दर्जेदार गृहप्रकल्पांच्या बांधकामांना सुरूवात केली होती. पण मंदीमुळे काम थांबलं. यामुळे जवळपास सर्व बिल्डर्सचं दिवाळं निघालं. अपूर्ण इमारती कोणीही खरेदी केल्या नाहीत. इथल्या वॅलेंसिया शहरातल्या अनेक इमारती तशाच पडून आहेत. अंदाजानुसार देशभरातली लिलाव करण्याचीही बँकांची तयारी नाही. इथल्या मालमत्तेच्या किंमती खूप घसरल्याने खरेदीदार मिळण्याची शक्यताही खूप कमी आहे. म्हणूनच घरांवर चोरांनी ताबा मिळवला आहे. चोर घरांमधले नळ, कॉपर वायरिंग तसंच इतर वस्तू काढून बाजारात विकतात. वॅलेसियामध्ये मालमत्तेच्या किंमती ५० टक्क्यांनी घटल्या आहेत.

## आकाशगंगा पाहायची? येथे जा!

मुंबई, दिल्ली किंवा चेन्नईसारख्या महानगरातील वाढत्या प्रदुषणामुळे आकाशातील तारे दिसतच नाहीत. आता मॉन्सून सुरू झाल्याने ढगांमुळे आकाश दिसत नाही; परंतु देशातील एक गाव असे आहे जेथे आपल्याला आकाशगंगा दिसते.

आकाशगंगा पाहण्यासाठी येथे पर्यटक जमतात. वाढत्या प्रदूषणाने तारे दिसत नाहीत. या गावाला जगातील सर्वात उंच गाव म्हटले जाते. आपला भारत इतका विशाल आहे, की येथे एकाच देशात अनेक प्रकारचे हवामान आणि भौगोलिक रचना पाहायला मिळत असते. हिमाचल प्रदेशातील स्पिती जिल्ह्यामध्ये हे गाव आहे. या गावाला जगातील सर्वात उंच गाव म्हटले जाते. या गावाचे नाव कौमिक गाव. येथे आपल्या उघड्या डोळ्यांनी आकाशगंगा पाहायला मिळते. ते पाहण्यासाठी दुर्बिणीची गरज नसते. रात्रीच्या अंधारात तारे असे चमकतात की आपण विश्वास ठेवू शकणार नाही. याचा अनुभव घेण्यासाठी या गावात जायलाच हवे.


कौमिक गाव समुद्रसपाटीपासून सुमारे १५ हजार २७ फूट उंचीवर वसलेले



आहे. तिथे मोटर बाइकने सहज जाता येते. यामुळेच या गावात पर्यटकांचा राबता असतो. या गावात जून महिन्यातील तापमान सात ते नऊ अंश सेल्सियसपर्यंत खाली उतरलेले असते. थंडीत इथली घरेदेखील रिकामी असतात. कारण एवढ्या थंडीत गावात राहाणे शक्य नसते. दरम्यान, गावकरी पायथ्याशी असलेल्या घरांमध्ये राहतात. थंडी गेली की पुन्हा ते आपल्या गावातील मूळ घरात येतात. कौमिक गावाची आशियातील नव्हे, तर जगातील सर्वात उंच

## आपले हात

**हा**त हा माणसाचा अत्यंत महत्त्वाचा अवयव. हात नसतील तर माणूस काहीही करू शकणार नाही. त्यातही उजवा हात म्हणजे माणसाचं सर्वस्व. म्हणूनच आपला हात जगन्नाथ ही म्हण अस्तित्त्वात आली असावी. तर अशा या हातांशी संबंधित गंमतीशीर बाबी आपण जाणून घेऊ या.



आपल्या बोटांत स्नायू नसतात. ज्या स्नायूंमुळे बोटं हलतात ते हाताच्या पंजात असतात. हे स्नायू बोटांशी जोडलेले असतात. १२.६ टक्के पुरूष तर ९.९ टक्के महिला डावखुऱ्या असतात.

खेळाडूंना होणाऱ्या एक चर्तुथांश जखमा हात किंवा मनगटाशी संबंधित असतात. पंजा ओला राहिला तर त्यावरची त्वचा सुरकुतते. यामागचं नेमकं कारण माहीत नसलं तरी नसांमुळे असं होत असल्याचा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. अंगठ्यावर एकूण नऊ स्नायू नियंत्रण ठेवतात. या स्नायूंवर हातांशी संबंधित तीन नसांचं नियंत्रण असतं. प्रत्येक हातात छोटी मोठी २९ हाडं असतात. २९ मुख्य सांधे, बोटं हलवणारे ३४ स्नायू, ४८ नसा आणि ३० रक्तवाहिन्या असतात. एक हजार लोकांमध्ये एक जण दोन्ही हातांचा एकसारख्या पद्धतीने वापर करु शकतो. स्पर्शामुळे ऑक्सिटॉसिन हार्मोन्सची निर्मिती होते. या हार्मोन्समुळे आपल्याला बरं वाटतं. हात धरल्यामुळे स्ट्रेस हार्मोन्सचं प्रमाण कमी होतं.

## ट्रॅफिक टाळण्यासाठी हेलिकॉप्टरने प्रवास

**ज**गाची लोकसंख्या वेगाने वाढत आहे. त्याच वेगाने शहरांमधील रहदारीही वाढत आहे. अशा परिस्थितीत कार किंवा बाईकने बाहेर पडल्यास तासनतास ट्रॅफिक जॅममध्ये अडकण्याचा दैनंदिन अनुभव असतो. ऑफिसला जाणाऱ्यांना स्वत:च्या वाहनाने जाणे अधिक कठीण झाले आहे. म्हणूनच बहुतेक लोक मेट्रोमध्ये प्रवास करणे योग्य मानतात. असेच एक प्रकरण अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरातून समोर आले आहे. तिथे एका महिलेने ट्रॅफिक टाळण्यासाठी अनोखा उपाय योजला आणि हेलिकॉप्टरने आपले कार्यालय गाठले.

अमेरिकेतील न्यू यॉर्कमध्ये राहणारी भारतीय वंशाची महिला खुशी सूरीने तिच्या एक्स अकाउंटवरून एक स्क्रिनशॉट शेअर केला आहे. खुशीला काही कामानिमित्त बाहेर जायचे होते आणि तिला न्यूयॉर्कच्या ट्रॅफिकची चांगलीच कल्पना होती. तिने कॅब बुक करण्यास सुरुवात केली, तेव्हा तिच्याकडे त्यासाठी १३० डॉलरची मागणी करण्यात आली आणि तिला एक तासाची वेळ सांगण्यात आली. हे पाहून खुशीने कॅब राइड रद्द केली आणि



ब्लेड या साईटचा आधार घेतला. ही साईट अमेरिकेत हेलिकॉप्टर कॅब सुविधा प्रदान करते. खुशीने हेलिकॉप्टर राईडचा दर पाहिला, तेव्हा तो कारपेक्षा फक्त तीस डॉलर जास्त होता आणि राईड केवळ पाच मिनिटांत पूर्ण झाली. त्यामुळे खुशीने कॅबऐवजी हेलिकॉप्टरने जाण्याचा निर्णय घेतला.

खुशीने हा अनुभव सोशल मीडियावर शेअर केला आहे. तिच्या पोस्टवर यूजर्सने कमेंट केल्या आहेत. एका यूजरने लिहिले, की १६० डॉलर्स खूप आहेत. भारतातील अनेक लोकांचा हा पगार आहे. दुसऱ्या वापरकर्त्याने लिहिले, की इतके पैसे देण्यापेक्षा मी पायी चालणे पसंत करेन, तर दुसऱ्या यूजरने लिहिले, की दीदी फक्त राईडसाठी १३ हजार देत आहे, मग ती किती कमावते?

## माणसं पिंजऱ्यात, प्राणी स्वातंत्र्यात

**प्रा**णीसंग्रहालयात प्राणी पिंजऱ्यात असतात आणि पर्यटक बाहेरून त्यांना न्याहाळत असतात. पण चीनमधल्या एका प्राणीसंग्रहालयात माणसं पिंजऱ्यात बंदिस्त होऊन फिरतात तर प्राणी मोकळेपणाने बाहेर फिरत असतात. 'लेहे लेदू वाईल्डलाईफ झू' असं या ठिकाणाचं नाव आहे. इथे प्राण्यांना



पूर्ण मोकळीक देण्यात आली आहे. माणसं पिंजरा असणाऱ्या गाडीत बसतात. ही गाडी त्यांना प्राणीसंग्रहालय फिरवून आणते. चीनमधल्या चाँगक्विंग शहरातलं हे स्थान पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र बनलं आहे. २०१५ मध्ये ते सुरू करण्यात आलं. यामुळे पर्यटक प्राण्यांना खूप जवळून बघू शकतात. पर्यटकांनी भरलेला पिंजरा प्राण्यांजवळ नेला जातो. शिकार बघून प्राणी जवळ येतात. मग त्यांना अन्नही देता येतं. हा थरार अनुभवण्याची मजा निराळीच आहे. जंगली श्वापदं पिंजऱ्यावर चढून बसतात. यावेळी पर्यटकही श्वास रोखून धरतात. पण पिंजऱ्याच्या आत ते पूर्णपणे सुरक्षित असतात. इथलं प्रशासन सुरक्षेच्या बाबतीत सर्वतोपरी काळजी घेतं. लोकांना सूचनाही दिल्या जातात. बोटंही बाहेर न काढण्याचं आवाहन केलं जातं. जनावराने पाठलाग सुरू केल्यानंतर काय वाटू शकतं याची जाणीव करून देण्याचा हा एक प्रयत्न असल्याचं इथल्या प्रशासनाचं म्हणणं आहे. पांढरा वाघ, पट्टेदार वाघ, सिंह, अस्वल अशी श्वापदं इथे मुक्तपणे फिरत असतात.

## ...म्हणून ती पोलिसात गेली

**द**ही किंवा कोणताही पदार्थ कोणी खाल्ला म्हणून कोणी थेट पोलिसात तक्रार करायला जात नाही. पण तैवानमधल्या एका मुलीने अवघं १०० रुपयांचं दही चोरीला गेल्याची तक्रार केली. इतकंच नाही तर आरोपीला शोधण्यासाठी पोलिसांनी काही हजार रुपये खर्च केले. त्याचं झालं असं की होस्टेलमध्ये राहणाऱ्या एका तरूणीने फ्रीजमध्ये दही ठेवलं होतं. पण ते कोणी तरी खाऊन टाकलं. तिने काही मुलींकडे चौकशी केली. पण हाती काहीच लागलं नाही. मग तिने थेट तैपई पोलिसात तक्रार केली. सुरूवातीला पोलिसांनाही धक्का बसला. पण नंतर त्यांनी तिची तक्रार नोंदवून घेतली. दह्याच्या पाकिटावरच्या ओलसरपणामुळे त्यावर हाताचे ठसे उमटले नव्हते. त्यामुळे दोषींना पकडताना त्यांना बऱ्याच अडचणी येत होत्या. अशा वेळी तरूणीने पोलिसांना फॉरेन्सिक टीमची मदत घेण्याचा सल्ला दिला. मग या टीमने एका तरूणीसह सहा लोकांची डीएनए चाचणी केली. या चाचणीच्या निकालांवरून पोलिसांनी आरोपीला पकडलं खरं पण या चौकशीसाठी तब्बल ४२ हजार रुपये खर्च




झाले. एका माणसाच्या डीएनए चाचणीसाठी पोलिसांनी तीन हजार तैवानी डॉलर म्हणजे तब्बल ७ हजार रुपये खर्च केले. अर्थात या प्रकरणाबद्दल तैवानी नागरिकांनी नापसंती व्यक्त केली आहे. एवढ्याशा घटनेसाठी करदात्यांचे पैसे फुकट घालवण्याची काहीच गरज नव्हती, असं लोकांचं म्हणणं आहे. चार आण्याची कोंबडी आणि बारा आण्याचा मसाला असाच हा प्रकार म्हटला पाहिजे.

## बर्गर बनवणारा 'क्रिएटर'


**रो**बो ही संकल्पना आता अनोखी राहिलेली नाही. परदेशात सुरक्षारक्षक किंवा कर्मचारी म्हणून रोबोंची नेमणूक करण्यात येत असल्याचं तुम्ही ऐकलं असेल. ते घरकामासह विविध प्रकारची कामं करू शकतात. असाच एक रोबो अमेरिकेतल्या सॅन फॅन्सिस्कोमधल्या रेस्तराँमध्ये काम करतो.'क्रिएटर' असं त्याचं नाव. हा 'क्रिएटर' बर्गर एक ठेऊ शकतो. ही कामं करताना 'क्रिएटर' अजिबात गोंधळत नाही. त्याच्याकडून चूकही होत नाही. याचं कारण म्हणजे प्रोग्रामिंगचं तंत्रज्ञान. या तंत्रज्ञानामुळे तो सगळी कामं वेगात आणि अचूक करू शकतो. यासोबतच ग्राहकांच्या आवडीनुसार तो मसाले घालून बर्गरमधलं पॅटिस कडक किंवा मऊ भाजून देतो. शास्त्रज्ञांनी त्यादृष्टीनेच



बनवतो. तो बर्गर बनवणारा जगातला पहिलाच स्वयंचलित रोबो असल्याचं 'फोर्ब्ज'चं म्हणणं आहे. तो ताजा, लुशलुशीत आणि चविष्ट बर्गर बनवतो. इतकंच नाही तर एका वेळी भरपूर बर्गर तयार करू शकतो. 'क्रिएटर' एकाच आकारात कांदा, टोमॅटो, काकडीच्या चकत्या कापू शकतो. पनीर, चिकनचे समान तुकडे करू शकतो. चिकन किंवा व्हेज पॅटिस भाजू शकतो. बर्गरचा ब्रेड कापून यात हे सगळं साहित्य एकावर 'क्रिएटर'ची रचना केली आहे. हा रोबो एका तासात १२० बर्गर तयार करतो. त्याच्यात थर्मल सेंसरवर चालणारं यंत्र बसवण्यात आलं आहे. क्रिएटरमध्ये तब्बल ३५० सेंसर्स असून २० कॉम्प्युटर्सच्या मदतीने तो काम करतो. त्याने तयार केलेल्या बर्गरना भरपूर मागणी असून ६ डॉलर एवढी एका बर्गरची किंमत आहे. असा हा अनोखा 'क्रिएटर' सोशल मीडियावर बराच लोकप्रिय झाला.

## चित्र-विचित्र शिक्षा

**शि**क्षा म्हणजे नेमकं काय या प्रश्नाचं उत्तर आपल्याला न आवडणारी गोष्ट करावी लागणं हे असू शकतं. शिक्षा म्हटली की आपल्याला तुरुंग दिसतो. पण जगभरात वेगवेगळ्या प्रकारच्या शिक्षा देण्यात येतात. काही शिक्षा इतक्या गमतीशीर आहेत की त्यांच्याबद्दल ऐकल्यानंतर आपण पोट धरून हसू. अमेरिकेतल्या मिसौरीतल्या डेव्हिड बेरीला हरणांची शिकार केल्याप्रकरणी दोषी धरण्यात आलं, तुरुंगात टाकण्यात आलं. पण इथे डिज्नेचं बाम्बी कार्टून बघण्याची शिक्षा त्याला देण्यात



आली. २००३ मध्ये शिकागोतल्या दोन तरूणांना ४५ दिवसांचा तुरूंगवास ठोठावण्यात आला होता. ख्रिसमसच्या पूर्वसंध्येला येशूची मूर्ती चोरल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला होता. या दोघांची गाढवावरुन धिंड काढण्यात आली. मूर्खपणाच्या गुन्ह्यासाठी आम्ही माफी मागतो, असं पोस्टर त्यांना लिहावं लागलं. स्पेनमधल्या एका तरूणाने पॉकेटमनी बंद केल्यामुळे आईवडिलांना कोर्टात खेचलं. पण न्यायालयाने उलट या मुलालाच शिक्षा ठोठावली. आईवडिलांच्या घरातून बाहेर पडून स्वत:च्या पायावर उभं राहून दाखवण्याची शिक्षा त्याला देण्यात आली. २००८ मध्ये अँड्रू वेक्टरला ध्वनी प्रदुषणाबद्दल १२० पाउंड भरण्याची शिक्षा देण्यात आली. तो रॅप संगीत ऐकत होता. यासोबत त्याला शास्त्रीय संगीत ऐकायची शिक्षा देण्यात आली.



नावडतं संगीत ऐकताना किती त्रास होतो याची जाणीव करवून देण्याच्या उद्देशाने वेक्टरला ही शिक्षा देण्यात आली होती. तो फक्त १५ मिनिटं ते संगीत ऐकू शकला.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, ✲ कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11